महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ (म.)

# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.

## ४५ वा वार्षिक अहवाल - २०२१-२२



**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित**
**दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५**

क्र.कं.स.का.वि./४५ वी वा.स.सभा/२०२३/२०४
दि. ०६.०४.२०२३

# ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या. ची ४५वी वार्षिक सर्वसाधारण सभा **मंगळवार दि.०२.०५.२०२३ रोजी सायंकाळी ५.३०** वाजता मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे निवासस्थान, पर्णकुटी, मलबार हिल, मुंबई - ४०० ००६ येथे आयोजित केली आहे. त्यावेळी पुढील कामकाज करण्यात येईल.

**सर्वसाधारण विषय**

१) संचालक मंडळाचा २०२१-२२ चा वार्षिक अहवाल आणि दि.३१ मार्च, २०२२ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचे (वित्तीय वर्ष २०२१-२२) महामंडळाचे लेखा विवरण पत्र, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद आणि त्यावरील महालेखाकार, भारत सरकार यांचा अहवाल स्वीकारणे व त्यावर विचारविनिमय करणे.

२) दि.३१ मार्च, २०२२ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षासाठी (वित्तीय वर्ष २०२१-२२) लाभांश घोषित करण्याबाबत विचार विनिमय करणे.

**विशेष विषय :**

१) वित्तीय वर्ष २०२२-२३ च्या लेखापरीक्षणाकरिता महालेखाकार, भारत सरकार यांनी नियुक्त केलेले वैधानिक लेखापरिक्षक मे.ए.पी. संझगिरी अँड कंपनी यांच्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या शुल्कास मान्यता देणेबाबत विचार विनिमय करणे.

आदेशानुसार

(अश्विनी कांबळे)
कंपनी सचिव

**टीपा-**

१) ज्या सभासदंना सभेस हजर राहून मतदान करण्याचे हक्क आहेत अशा सभासदांना स्वतः हजर राहून मतदान करण्याऐवजी प्रतिनिधी (Proxy) नियुक्त करण्याचा अधिकार असेल. सदर प्रतिनिधी कंपनीचा सभासद असण्याची आवश्यकता नाही. प्रतिनिधी नियुक्त पत्र कार्यशील ठरण्याकरिता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात बैठक सुरु होण्याच्या ४८ तास अगोदर सादर करण्यात यावे.

प्रति,
मा. राज्यपालांचे अधिकृत प्रतिनिधी
सांस्कृतिक कार्य विभाग,
महाराष्ट्र शासन मार्फत,
मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२

सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे अधिकृत प्रतिनिधी
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय,
महाराष्ट्र शासन मार्फत,
जुने सचिवालय, एम. जी. रोड,
मुंबई-४०० ०३२

मा. श्री सुधीर मुनगंटीवार,
मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य विभाग तथा
अध्यक्ष, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि
सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या.
मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२

मा. श्री. विकास खारगे, भा.प्र.से.,
प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग तथा
संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि
सांस्कृतिक विकास महामंडळ,
मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२

डॉ. अविनाश ढाकणे, भा.प्र.से.,
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि
सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या.
दादासाहेब फाळके चित्रनगरी
गोरेगांव(पुर्व),मुंबई-४०० ०६५

श्री. बिभिषण चवरे,
संचालक,सांस्कृतिक कार्य संचालनालय तथा
संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि
सांस्कृतिक विकास महामंडळ
दादासाहेब फाळके चित्रनगरी
गोरेगांव(पुर्व),मुंबई-४०० ०६५

श्री. सतीश गुप्ता
सनदी लेखापाल
मे. ए.पी.संझगिरी आणि कंपनी
प्लॉट नं.२२, रुम नं.१७४, आनंद नगर लेन,
वाकोला पोलीस स्टेशनच्या मागे,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई- ४०० ०५५.

# दि.३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठी संचालकांचा अहवाल

प्रिय भागधारकहो,

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादितच्या ४५ व्या वार्षिक अहवालाबरोबर दि.३१ मार्च २०२२ अखेर संपणाऱ्या वर्षाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, तसेच ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचा भाग असलेल्या टिपा अहवालासह सादर करण्यास आम्हांस आनंद होत आहे.

**१. कामाचे निष्कर्ष :**

महामंडळाची गेल्या दोन वर्षांच्या कामकाज परिणामाची आकडेवारी खाली दर्शविलेली आहे, जी महामंडळाचे तुलनात्मक परिणाम दर्शविते.

(रु. लाखात)

| तपशिल | २०२१-२२ | २०२०-२१ |
|---|---|---|
| **उत्पन्न :** | | |
| अ. कार्याबाबतचे उत्पन्न | ६५६१.५२ | ५५८४.१९ |
| ब. इतर | १२०२.३५ | १३५८.५६ |
| **एकूण** | **७७६३.८७** | **६९४२.७५** |
| **खर्च :** | ३६८०.९४ | ३५००.०० |
| घसारा आणि आयकरपूर्व नफा/तोटा | **४०८२.९३** | ३४४२.७५ |
| वजा : घसारा | ४४६.९३ | ५००.३९ |
| करपूर्व नफा (तोटा) | **३६३६.००** | **२९४२.३६** |
| वजा : कराची तरतूद | ९५०.०० | ८००.०० |
| वजा : पूर्वीच्या वर्षाचे कर | ०.०० | २४९.३२ |
| वजा : प्रलंबित कर देयता / (मालमत्ता) | २.८५ | (८.३४) |
| करानंतरचा नफा / (तोटा) | **२६८३.१५** | १९०१.३८ |
| योग्य कामाकरिता उपलब्ध नफा | **२६८३.१५** | १९०१.३८ |

**२. कार्य :**

महामंडळाचा निव्वळ नफा मागील वर्षी रु.१९०१.३८ च्या तुलनेत या वर्षीचा नफा रु.२६८३.१५ लाख आहे.

**३. आरक्षणासाठी हस्तांतरीत :**

संचालक असे प्रस्तावित करतात की, रु.२६८३.१५ लाख रक्कम सर्वसामान्य राखीव निधीमध्ये वळती करण्यात यावी.

**४. प्रतिभाग :**

संचालक प्रतिभागास रु.१३४.१५ लाख (रु.१०.९१०३/- प्रतिभाग) च्या लाभांशाची शिफारस करीत आहे.

**५. योजनांची परिपूर्तता :**

**१. बॉलिवुड पार्क :**

म.चि.रं.सां.वि.म. च्या व्यवस्थापनाने चित्रनगरी परिसरात "बॉलिवुड पार्क" नावाचे एक नवीन आकर्षण जोडले आहे. हे एक अशा प्रकारचे उद्यान आहे ज्यामध्ये आकर्षक झोन आहेत, ज्यामुळे पर्यटकांना विविध वातावरणाचा अनुभव घेता येतो. या व्यतिरिक्त यात एक समर्पित 7D व्हर्च्युअल रिॲलिटी स्टुडिओ आणि अभ्यागतांना ग्रीन क्रोमा तंत्रज्ञानाचे प्रदर्शन करणारी समर्पित जागा आहे. बॉलिवुड पार्क एप्रिल २०२२ पासून अभ्यागतांकरिता चालू करण्यात आले असून चित्रनगरीला येणाऱ्या प्रत्येक अभ्यागतांनी तेथे भेट द्यावी.

**२. एक खिडकी योजना :**

महाराष्ट्र फिल्म सेल, महाराष्ट्रातील चित्रीकरण परवानग्या सुलभ करण्यासाठी एक खिडकी योजना सेलने दुसऱ्या टप्प्यात प्रवेश केला आहे आणि म.चि.रं.सां.वि.म. संपूर्ण राज्यात या प्रणालीचा विस्तार करण्याच्या प्रक्रियेत आहे. सुरुवातीस रायगड जिल्ह्याला एक खिडकी योजना सेलवर आधीच सुरु केले आहे आणि रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर, कोल्हापूर, सोलापूर, अमरावती आणि नांदेड या इतर जिल्ह्यांमध्ये चित्रीकरण करण्याची प्रक्रिया आधीच सुरु करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या एक खिडकी योजना सेलने "राज्याच्या मालकीचा उपक्रम" मध्ये प्रतिष्ठित SKOCH सिल्व्हर पुरस्कार जिंकला आहे.

**३. दुबई एक्सपो - २०२० :**

मा. सांस्कृतिक कार्य मंत्री, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव आणि व्यवस्थापकीय संचालक, म.चि.रं.सां.वि.म. नोव्हेंबर, २०२१ मध्ये प्रतिष्ठित जागतिक एक्सपो दुबई २०२० मध्ये सहभागी झाले होते.

एक्सपो दरम्यान, डॉ. गणेश चंदनशिवे (लोकप्रिय मराठी संगीतकार) यांच्या नेतृत्वाखाली "शिवदर्शन सांस्कृतिक शाहिरी संच" तर्फे एक सांस्कृतिक कार्यक्रम जागतिक प्रेक्षकांसमोर सादर केले गेले. एक्सपो दरम्यान चित्रनगरीचे नवीन वेब पोर्टल देखील लॉंच करण्यात आले. या व्यतिरिक्त दुबई सरकारने चित्रपट, मीडिया आणि मनोरंजन क्षेत्रासाठी केलेल्या घडामोडी समजून घेण्यासाठी शिष्ट मंडळाने दुबई चित्रनगरीला भेट दिली.

६. **भांडवल व वित्तीय सहाय्य :**

**अ. भागभांडवल :**

दि.३१ मार्च २०२२ रोजी महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.१,५००.०० लाख असून प्रत्येकी रु.१००/- च्या १५ लाख समभागांमध्ये विभागलेले आहे. त्यापैकी महामंडळाचे भरणा झालेले भाग भांडवल रु.१,२२९.६४लाख आहे. संपूर्ण भरणा झालेले भाग भांडवल शासनाने अदा केलेले आहे.त्यामध्ये रु.१००/- चा एक भाग हा संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र शासन यांच्या नावावर आहे.

**ब. असुरक्षित कर्ज :**

महाराष्ट्र शासनाने महामंडळास मराठी चित्रपट निर्माते व इतर विभागीत चित्रपट निर्मात्यांना महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या शुटींग, रेकॉर्डींग, डबींग व एडीटींग इत्यादी सवलती देण्यासाठी एकूण रु.५६.४७ लाखाचे बिनव्याजी कर्ज मंजूर केलेले आहे. तथापि दि.१५ जुलै २००४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.९१/१८ अनुसार असा निर्णय घेण्यात आला होता की, शासनाला या कर्जाचे अनुदानात रुपांतर करण्याची विनंती करण्यात यावी किंवा सदर रक्कम शासनाकडून येणे असलेल्या रकमेतून समायोजित करण्यात यावी. पुन्हा दि.१७ मार्च, २०२१ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ठराव क्र.१५६/१५ मध्ये शासनाकडून महामंडळाला येणे असलेल्या एकूण रकमेतून शासनास देय असलेली एकूण रक्कम समायोजित करुन उर्वरित रकमेचा परतावा शासनाने महामंडळास करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याकरिता निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दि.११.०५.२०२१, २८.०७.२०२१ आणि ०९.०९.२०२१ रोजीच्या पत्राद्वारे शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

**७. वित्तीय वर्ष समाप्त होताना संचालकाचा अहवाल व सामग्रीमधील महत्वाच्या बदलाबाबत:**

वित्तीय वर्षाच्या शेवटी संचालकाचा अहवाल व सामग्रीमध्ये महत्वाचे असे बदल करण्यात आलेले नाही अथवा असे कुठेही आश्वासित केलेले नाही, ज्यामुळे महामंडळाच्या वित्तीय स्थितीवर तसेच वित्तीय निष्कर्षावर कोणत्याही प्रकारचे परिणाम होणार नाही.

**८. लेखांकन धोरणे आणि सामग्री बाबतचे आदेश पारित करणे किंवा न्यायालयीन प्राधिकरणाचे आदेशामुळे महामंडळाच्या चालू असलेल्या भविष्यातील कार्यभागावर कोणत्याही प्रकारच्या परिणामाबाबत:**

या वर्षाच्या कालवधीमध्ये लेखांकन धोरणे आणि सामग्री बाबतचे आदेश पारित करणे किंवा न्यायालयीन प्राधिकरणाचे आदेशामुळे महामंडळाच्या चालू असलेल्या भविष्यातील कार्यभागावर कोणत्याही प्रकारचे परिणाम होणार नाही याबाबतची स्थिती बाळगण्यात आलेली आहे.

**९. ठेवी**

वर्षभरात दि.३१.०३.२०२२ पर्यंत महामंडळाने सामान्य जनतेकडून कोणत्याही प्रकारच्या ठेवी स्वीकारलेल्या नाहीत किंवा त्यांचे नूतनीकरण केलेले नाही. दि.३१.०३.२०२२ रोजी दावे केलेल्या कोणत्याही प्रकारच्या बेवारशी ठेवी नाहीत.

**१०. व्यवसायाच्या स्वरुपातील बदल :**

व्यवसायाच्या स्वरुपात कोणत्याही प्रकारचा बदल केलेला नाही.

**११. संचालक**

अहवाल वर्षात महामंडळाच्या संचालक मंडळाची रचना खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | नाव | पद | कालावधी | |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. अमित विलासराव देशमुख,<br>मा. मंत्री,<br>सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष | ३०.१२.२०१९ | २९.०६.२०२२ |
| २. | श्री. सुधीर मुनगंटीवार<br>मा. मंत्री,<br>सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष | १४.०८.२०२२ | अहवालाच्या तारखेपर्यंत |
| ३. | श्री. राजेंद्र पाटील-यड्रावकर<br>मा. राज्यमंत्री,<br>सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र शासन | उपाध्यक्ष | ३०.१२.२०१९ | २९.०६.२०२२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | श्री. सौरभ विजय, भा.प्र.से.,<br>सचिव, सांस्कृतिक कार्य | संचालक | २४.०९.२०२० | अहवालाच्या तारखेपर्यंत |
| ५. | श्रीमती विनिता वैद्य सिंघल, (भा.प्र.से.)<br>व्यवस्थापकीय संचालक (अतिरिक्त कार्यभार ,)<br>महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित | संचालक | ०४.०५.२०२० | २१.०७.२०२० |
| ६. | श्रीमती मनीषा वर्मा, (भा.प्र.से.)<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित | संचालक | २२.०७.२०२० | २३.०९.२०२१ |
| ७. | श्री. कैलास पगारे, (भा.प्र.से.)<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित | संचालक | २४.०९.२०२१ | १४.०३.२०२२ |
| ८. | श्री. सौरभ विजय, भा.प्र.से.,<br>सचिव, सांस्कृतिक कार्य आणि<br>व्यवस्थापकीय संचालक (अतिरिक्त कार्यभार ,)<br>महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित | संचालक | १५.०३.२०२२ | २३.०३.२०२२ |
| ९. | श्री. विवेक भीमनवार,<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित | संचालक | २४.०३.२०२२ | ३०.०९.२०२२ |
| १०. | डॉ. अविनाश ढाकणे (भा.प्र.से.)<br>व्यवस्थापकीय संचालक<br>महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित | संचालक | ०१.१०.२०२२ | अहवालाच्या तारखेपर्यंत |
| ११. | श्री. बिभिषण चवरे,<br>संचालक,<br>सांस्कृतिक कार्य संचालनालय | संचालक | १७.०९.२०१९ | अहवालाच्या तारखेपर्यंत |

**१२. संचालकांच्या जबाबदारी बाबतचे वक्तव्य :**

महामंडळाचे संचालक मंडळ खात्री देत आहे की,

१. वार्षिक लेखे तयार करताना लागू असलेले लेखांकन प्रमाण पाळण्यात आले आहेत आणि त्यामध्ये वास्तवतेपासून तफावत नाही.

२. निवडक लेखांकन पद्धती नियमितपणे अंमलात आणल्या आहेत. संचालकांनी महामंडळाच्या दि. ३१ मार्च २०२२ पर्यंतच्या सर्वसामान्य परिस्थितीबाबत तसेच त्या दिवशी संपणाऱ्या वर्षात झालेल्या नफ्याबाबत खरे व उचित दर्शन घडेल याकरिता योग्य व उचित अंदाज व निर्णय घेतले.

३. कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार महामंडळाच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी तसेच फसवणूक आणि इतर अनियमितता शोधून काढण्यासाठी व ते राखण्यासाठी आवश्यक आणि पुरेसे लेखे दप्तर ठेवण्याची काळजी महामंडळाने घेतली आहे.

४. महामंडळाचे लेखे तयार करताना चालू असलेल्या संबंधित बाबींची पूर्तता केलेली आहे.

**१३. लेक्षापरिक्षक :**

**अ.** मे. ए.पी.संझगिरी आणि कंपनी (सनदी लेखापाल) रजिस्ट्रेशन नं.११६२९३डब्ल्यू यांना महामंडळाचे वैधानिक लेखा परिक्षक म्हणून महामंडळाची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा समाप्त होईपर्यंत नियुक्त करण्यात आले आहे.

१४. **उर्जा स्त्रोत, तांत्रिक, विदेशी चलनाद्वारे उत्पन्न आणि खर्चाबाबत :**

उर्जा व तंत्रज्ञान संदर्भातील आवश्यक माहिती सादर करणे बंधनकारक नसल्यामुळे येथे घेतले नाही. विदेशी चलनाद्वारे होणारे महामंडळाचे व्यवहार उत्पन्न व खर्च चालू वित्तीय वर्षामध्ये रु.३.०७ लाख आहे.

**१५. महामंडळाची सामाजिक जबाबदारी :**

महामंडळाने दि.२५.०३.२०१५ रोजी महामंडळाच्या सामाजिक जबाबदारीबाबत समिती गठीत केली असून समितीमधील सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. व्यवस्थापकीय संचालक | - | अध्यक्ष |
| २. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | - | सदस्य |
| ३. सह व्यवस्थापकीय संचालक | - | सदस्य |
| ४. गैर शासकीय सदस्य संचालक | - | सदस्य |

कंपनी कायदा अंतर्गत कलम १३५ नुसार वित्तीय वर्ष २०१९-२०, २०२०-२१ आणि २०२१-२२ साठी महामंडळाचे सामाजिक जबाबदारीचे दायित्व रु.२,२१,०९,६५७.००/- इतके आहे. महामंडळाने वित्तीय वर्ष २०२२-२३ मध्ये मागील अनुशेष भरुन काढावा.

**१६. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (पोश)**

कंपनी पोशच्या तरतुदींचे पालन करते. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या तरतुदी (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा, २०१३ च्या अनुपालनासाठी एक समिती आहे. पुनरावलोकनाधीन वर्षात लैंगिक छळाच्या कोणत्याही घटना नोंदवल्या गेल्या नाहीत.

**१७. संचालक मंडळाच्या बैठकीबाबत :**

या वर्षामध्ये महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दोन बैठका घेण्यात आलेल्या आहेत .

**१८. कलम १८६ नुसार कर्जाचा तपशील, हमी शुल्क किंवा गुंतवणूक :**

या वर्षामधील घेतलेल्या आढाव्यानुसार महामंडळाने कोणत्याही प्रकारचे अग्रीम, कर्ज याबाबत जामिन दिलेला नसून गुंतवणूक केलेली नाही.

**१९. खर्चाचे रेकॉर्ड**

कलम १४८ नुसार खर्चाच्या लेखापरीक्षणाची (cost audit) तरतूद कपंनीवर लागू होत नाही.

**२०.संबंधित पक्षांसोबतचे करार आणि व्यवस्था**

दि.३१.०३.२०२२ रोजी समाप्त झालेले वर्ष हाताच्या कोपऱ्याएवढे लांब आणि अगदीच सामन्य असल्याने या आर्थिक वर्षात केलेले सर्व संबंधित पक्ष व्यवहार संपले. त्यामुळे कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८८ च्या तरतुदी आकर्षित होत नाहीत. पुनरावलोकनाधीन वर्षात प्रवर्तक, संचालक किंवा कंपनीने केलेल्या इतर नियुक्त व्यक्ती यांनी भौतिकदृष्ट्या केलेले कोणतेही महत्वूपर्ण संबंधित पक्ष व्यवहार नाहीत, ज्यांच्या हिताशी कंपनीचा मोठ्या प्रमाणावर संभाव्य संघर्ष असू शकतो. अशा प्रकारे फॉर्म नं.AOC-२ मध्ये प्रकटीकरण आवश्यक नाही. तथापि, लेखामानक १८ नुसार या वर्षासाठी संबंधित पक्षासोबतच्या व्यवहारांचे प्रकटीकरण, सबंधित पक्षांचे खुलासे दि.३१.०३.२०२२ रोजीच्या ताळेबंदातील टीप क्र.२६ येथे देण्यात आले आहेत.

**२१. ऋणनिर्देश :**

महामंडळ विशेषतः सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, आमचे बँकर्स, सहकारी आणि विविध संस्था जे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या महामंडळाच्या कारभारात सहभागी होते व ज्यांनी अमूल्य सहकार्य व सेवा दिल्या त्यांची नोंद घेत आहे. महामंडळामध्ये ज्या विविध संस्थांनी निधी गुंतविले आहेत, त्यांचेही महामंडळ आभारी आहे.महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक प्रयत्नाबद्दलही महामंडळाला त्यांचा अभिमान आहे.

| | | |
|---|---|---|
| स्थळ : मुंबई | (डॉ. अविनाश ढाकणे) | (बिभीषण चवरे) |
| दिनांक : १७.११.२०२२ | व्यवस्थापकीय संचालक | संचालक |

**वार्षिक विवरणाचा उतारा फार्म नंबर एमजीटी-९**

१. कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम ९२(३) अन्वये आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ मधील नियम १२(१) अन्वये

| | | |
|---|---|---|
| १. | कंपनीचा ओळख क्रमांक | UP2100MH1977SGCO19882 |
| २. | नोंदणीचा दिनांक | २६.०९.१९७७ |
| ३. | कंपनीचे नाव | **महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित** |
| ४. | कंपनीचा वर्ग/उपवर्ग | राज्य शासनाची समभागाद्वारे मर्यादित कंपनी |
| ५. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता आणि संपर्काचा तपशील | **दादासाहेब फाळके चित्रनगरी, फिल्मसिटी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५**<br>दूरध्वनी क्र.०२२-२८४९७५००<br>फॅक्स क्र.०२२-२८४००७३४<br>ईमेल - info@filmcitymumbai.com |
| ६. | कंपनीचा स्टॉक एक्सचेंजच्या यादीत समावेश आहे का? | असूचीबद्ध |
| ७. | निबंधक आणि हस्तांतरण दलाल असल्यास त्यांचे नाव, पत्ता आणि संपर्काचा तपशील | लागू नाही. |

**२. सूत्रधारी, उपकंपनी आणि सहयोगी कंपनीचा तपशील**

| **अ.क्र.** | **कंपनीचे नाव आणि पत्ता** | **सीआयएन / जीएलएन** | **सूत्रधारी / उपकंपनी / सहयोगी** | **धारण केलेले समभाग** | **लागू असलेले कलम** |
|---|---|---|---|---|---|
| लागू नाही. | लागू नाही. | लागू नाही. | लागू नाही. | लागू नाही. | लागू नाही. |

**३. भागधारण ढाचा (एकूण समभागाच्या टक्केवारीनुसार भाग भांडवलाचा तपशील)**

१) **<u>वर्गनिहाय भागधारण</u>**: महामंडळाचा एकूण भरणा झालेला समभाग १२,२९,६४१ इतका असून प्रत्येक भाग रु.१००/- चा आहे. संपूर्ण भरणा झालेले भागभांडवल शासनाने अदा केले असून एक भाग संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र शासन यांच्या नावावर आहे. प्रवर्तकांच्या भागधारणेमये काहीही बदल नाही.

२) **प्रवर्तकांची भागधारण** :

| अ.क्र. | भागधारकाचे नाव | वर्षाच्या सुरुवातीस भागधारण | | | वर्ष अखेरीस भागधारणा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भाग संख्या रु.१००/- प्रत्येकी | कंपनीच्या एकूण भागापैकी टक्केवारी | एकूण भागाच्या तारण/अडथळा असलेल्या भागाची टक्केवारी | भाग संख्या रु.१००/- प्रत्येकी | कंपनीच्या एकूण भागापैकी टक्केवारी | एकूण भागाच्या तारण/अडथळा असलेल्या भागाची टक्केवारी | वर्षातील भागधारणेत झालेल्या बदलाची टक्केवारी |
| १. | महाराष्ट्राचे राज्यपाल | १२२९६४१ | १००% | निरंक | १२२९६४१ | १००% | निरंक | निरंक |

३) दि.३१.०३.२०२२ रोजी प्रवर्तकांच्या भागधारणेत झालेला बदल (कोणताही बदल नसल्यास तसेच दर्शवावे)
वर्ष कालावधीत प्रवर्तकांच्या भागधारणेत कोणतेही बदल झाले नव्हते.

**४) उपकृतता :**
थकीत / उपर्जित व्याजासह परंतु जे अदायगीसाठी देय नाही अशी कंपनीची उपकृतता : निरंक

**५) संचालक आणि प्रमुख्य व्यवस्थापकीय व्यक्तींचे वेतन :**

अ) व्यवस्थापकीय संचालक, पूर्ण वेळ संचालक आणि / किंवा व्यवस्थापकांचे वेतन

१. श्रीमती मनीषा वर्मा, भा.प्र.से., व्यवस्थापकीय संचालक रु.१४.२५ लाख
२. श्री. कैलाश पगारे, भा.प्र.से., व्यवस्थापकीय संचालक रु.१२.६९ लाख

ब) इतर संचालकांचे वेतन : निरंक

क) यवस्थापकीय संचालक/व्यवस्थापक/पूर्ण वेळ संचालकाव्यतिरिक्त प्रमुख व्यवस्थापकीय व्यक्तींचे वेतन

| अ.क्र. | वेतनाचा तपशील | प्रमुख व्यवस्थापकीय अधिकारी | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रमुख कार्यकारी अधिकारी | कंपनी सचिव | मुख्य वित्त अधिकारी | |
| १. | ढोबळ वेतन | | रु.४,८३,२२१ | | रु.४,८३,२२१ |
| अ) | आयकर कायदा १९६१ चा भाग १७(१) मधील तरतुदीनुसार वेतन | - | - | - | - |
| ब) | आयकर कायदा १९६१ चा भाग १७(२) खाली अवांतर प्राप्तीचे मूल्य | - | - | - | - |
| क) | आयकर कायदा १९६१ चा भाग १७(३) खाली | - | - | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | वेतनातून नफा | | | | |
| २. | भाग विकल्प | - | - | - | - |
| ३. | समभाग | - | - | - | - |
| ४. | कमिशन<br>- कमिशन टक्केवारीनुसार<br>- इतर असल्यास दर्शवावे | - | - | - | - |
| ५. | इतर, कृपया दर्शवावे | - | - | - | - |
| ६. | एकूण | - | रु.४,८३,२२१ | - | रु.४,८३,२२१ |

६) दंड / शास्ती / अपराधाना बंधन :

आर्थिक वर्षात कंपनी किंवा तिचे संचालक किंवा इतर अधिकाऱ्यांच्या विरुद्ध कंपनी कायद्याच्या कोणत्याही कलमाच्या उल्लंघनासाठी कोणतेही दंड / शिक्षा / परिणामगणन गुन्हे नाहीत.

स्थळ : मुंबई
दिनांक : १७.११.२०२२

(डॉ. अविनाश ढाकणे)
व्यवस्थापकीय संचालक

(बिभीषण चवरे)
संचालक

**मे. ए. पी. संझगिरी आणि कंपनी**
**सनदी लेखापाल**

# स्वतंत्ररित्या लेखा परिक्षकांचा अहवाल

प्रिय,
भागधारक
महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित,
मुंबई.

**वित्तीय विवरणांवर लेखापरीक्षण अहवाल**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादितचा (कंपनी) दि. ३१ मार्च २०२२ रोजी प्रमाणे असलेल्या ताळेबंदाची तसेच या दिवशी संपलेल्या वर्षासाठी असलेल्या, त्यासोबत जोडलेल्या नफा व तोटा लेख्याचे आणि रोखीचा ओघ (Cash Flow) दर्शविणारे पत्रक, महत्वपूर्ण लेखा धोरण आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहितीसह वित्तीय विवरणपत्रांवर टीपा यांची आम्ही लेखापरिक्षा केली आहे.

**सशर्त मत :**

आमच्या मते आणि आम्हाला प्राप्त सर्वोत्तम माहितीनुसार व आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार सशर्त मत विभागाच्या आधारामध्ये वर्णन केलेल्या बाबींचे संभाव्य परिणाम वगळता, उपरोक्त आर्थिक विधाने कंपनी कायदा २०१३ प्रमाणे योग्य त्या पद्धतीने आवश्यक असलेली माहिती देताना सर्वसाधारण भारतात स्वीकारलेल्या लेखा तत्वानुसार सत्य व यथार्थ चित्रण देतात, जसे ताळेबंदाबाबत कंपनीच्या दि. ३१ मार्च २०२२ रोजी असलेल्या कारभाराचे आणि नफा-तोटा पत्रकाबाबतचा त्याच दिनांकास समाप्त होणाऱ्या वर्षातील नफा तसेच वित्तीय वर्षाच्या अंतिम तारखेस रोखीचा ओघ दर्शविणारा तक्ता तयार केला आहे.

**सशर्त मताचा आधार :**

या अहवालात वर्णन केलेल्या चुकीच्या विधानाचे परिणाम आणि न सापडलेल्या चुकीच्या विधानांचे संभाव्य परिणाम वित्तीय विवरणांवर पुरेसे आणि योग्य लेखापरीक्षण पुरावे मिळवण्यात अक्षमतेमुळे जे भौतिक आहेत परंतु वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे व्यापक नाहीत अशा मुद्यांकडे आम्ही लक्ष वेधतो. मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

१. टीप क्र.१०-अ (अ)(I) मध्ये नमूद केल्याप्रमाणे १) ५२१ एकर जमीन (मूल्य अद्याप निश्चित केलेले नाही) आणि ii) शासन निधीतून उभारलेल्या रु.१३३.०० लाखाचे प्रकल्पांचे (जुनी कार्यालय इमारत, रेकॉर्डीग प्रिव्ह्यू थिएटर, स्टुडीयो नं.१ व २ कॉम्प्लेक्स, कर्मचारी निवासस्थान, सह व्यवस्थापकीय संचालक बंगला, फिल्मसिटी कॅन्टीन, २ आश्रयस्थान, सुरक्षा गेट, रिझरर्व्हायर गार्डन येथील पाण्याची टाकी) यांचे हस्तांतरण अद्यापही महामंडळाच्या नावे होणे बाकी आहे. अजूनही

पुस्तकामधील नोंदीमध्ये कंपनीच्या नावे या मालमत्तांचे मालकी हक्काने हस्तांतरण व्हावयाचे बाकी आहे. चित्रपट / मालिका चित्रिकरणासाठी जेव्हाही ही जागा भाड्याने दिली जाते तेव्हा कंपनीच त्याचे रेकॉर्ड ठेवते आणि उत्पन्न प्राप्त करते. तसेच दुरुस्ती आणि देखभालावरील खर्चाची नोंद कंपनीच्या पुस्तकामध्ये स्वतःचा खर्च म्हणून दर्शविली जाते.

२. कंपनीने अद्याप तिच्या आर्थिक विवरणांवर कायद्यांतर्गत खालील उल्लंघनाचे परिणाम निश्चित केलेले नाहीत.

अ) टीप ५१(ग) करिता माहिती मागविण्यात आली आहे, ज्यामध्ये कंपनीने आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२१-२२ साठी लेखा पुस्तकांमध्ये तरतूद केलेले महामंडळाच्या सामाजिक जबाबदारीचे (CSR) उत्तरदायित्व एकूण रु. २,२१,०९,६५७/- विरुद्ध कोणतीही रक्कम CSR कियाकलापांसाठी खर्च केलेली नाही हे लक्षात घेऊन "खर्च न केलेले महामंडळाचे सामाजिक जबाबदारी खाते" या वेगळ्या खात्यात तिचे हस्तांतरण करणे अद्याप बाकी आहे.

ब) टीप ४५ करिता माहिती मागविण्यात आली आहे, ज्याद्वारे कंपनीने त्यांच्या ग्राहकांकडून ३६५ दिवसांपेक्षा जास्त काळासाठी चित्रिकरण शुल्कापोटी मिळालेले निर्विवाद अग्रिम रु.८४.४३ लाख परतावा / समायोजित करणे बाकी आहे, जे कंपनी (ठेव स्वीकारणे) नियम, २०१४ च्या तरतुदींचे उल्लंघन ठरते.

३. कंपनीने खालील व्यवहारांसाठी पावत्या जमा केल्या नाहीत किंवा कोणत्याही देय रकमेचा हिशेब ठेवला नाही ज्यामुळे त्या प्रमाणात उत्पन्न कमी केले गेले.

अ) MOS युटिलिटी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडसोबतच्या करारानुसार देयक वेळेवर न मिळाल्यास व्याज आकारणे आवश्यक आहे. वर्षभरात कंपनीने MOS युटिलिटी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडने देयक भरण्यास विलंब केल्याबद्दल आकारल्या जाणाऱ्या व्याजासाठी रु.२२.५७ लाख इतके देयक आकारलेले नाही.

ब) कंपनीने श्री. साई बालाजी हॉस्पिटॅलिटीला तीन स्थळे भाड्याने दिली असून या जागांसाठी देयकांची एकूण रक्कम रु.६३.६० लाख होती, परंतु कंपनीने फक्त रु.१६.५० लाखांचे देयक आकारले, परिणामी रु.४७.६० लाख इतक्या रकमेचे उत्पन्न कमी आकारले गेले.

क) कंपनीने रिलायन्स मिडीया वर्क्स लिमिटेडकडून प्रोसेसिंग लॅब शुल्कासाठी महसूल गळती शोधण्यासाठी एक विशेष लेखापरीक्षण केले आहे. दि.२७ मे, २०२१ च्या विशेष लेखापरीक्षण अहवालावर आधारित रिलायन्स मिडीया वर्क्स लिमिटेडकडून आर्थिक वर्ष १९९८-९९ ते २०१५-१६ पर्यंत प्रक्रिया उत्पन्न म्हणून एकूण रु.२२.२६ कोटी प्राप्य होते. परंतु दि.३१ मार्च, २०२२ पर्यंत प्राप्त झालेली वास्तविक रक्कम रु.२१.७४ कोटी आहे. शिल्लक रक्कम रु.५२.०० लाखाचे देयक व हिशेब देणे बाकी आहे.

ड) कंपनीने प्राईम फोकस लि. (यापूर्वीचे अॅडलॅब फिल्म्स लि. आणि रिलायन्स मिडीया वर्क्स) यांच्या वर्ष २०१७-१८ पासूनच्या वार्षिक उलाढालीवर ३% (कच्च्या फिल्मची किंमत वगळता प्रक्रिया शुल्क) रकमेचा दावा केलेला नाही, त्यामुळे त्या मर्यादेपर्यंत उत्पन्न कमी लेखण्यात आले, जे परिणाम करण्यायोग्य नाही .

इ) वर्षभरात १८-२० ऑक्टोबर या कालावधीत चित्रनगरी परिसरात विविध ठिकाणी मलबा (debris) टाकल्याचे निदर्शनास आले. कंपनीच्या अभियांत्रिकी विभागाच्या अहवालानुसार एकूण ११५ ट्रकांनी मलबा रिकामा केला होता. दि.१८.०८.२०२० रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार, मोठ्या वाहनांद्वारे अनधिकृतपणे प्रवेश केल्यास प्रति वाहन रु.१०,०००/- दंड आकारण्यात येईल. त्यानुसार ११५ ट्रकसाठी रु.११.५० लाखाचा दंड अद्याप वसूल झालेला नाही किंवा कंपनीच्या लेखावह्यांमध्ये जमा झालेला नाही.

आम्ही कायद्याचे कलम १४३(१०) नुसार निर्दिष्ट केलेल्या लेखापरीक्षण (एसए) मानकानुसार आमचे लेखापरीक्षण केले आहे. त्या मानकांनुसार आमच्या जबाबदाऱ्या आमच्या अहवालातील वित्तीय विवरणपत्रांचे लेखापरीक्षण या विभागात लेखापरीक्षकांची जबाबदारी यामध्ये वर्णन केल्या आहेत. आम्ही भारतीय सनदी लेखापालांच्या संस्थेतर्फे जारी केलेल्या आचारसंहितेच्या अनुषंगाने तसेच त्यातील अधिनियम आणि त्यातील नियमांच्या तरतुदीनुसार आमच्या वित्तीय विवरणपत्रांच्या लेखापरीक्षणाशी संबंधित असलेल्या नैतिक आवश्यकतांसह अहवाल सादर करण्यास स्वतंत्र आहोत. आमच्या इतर नैतिक जबाबदाऱ्या या नैतिक आवश्यकताआणि आचारसंहितेनुसार पूर्ण केल्या आहेत.

आमचा विश्वास आहे की, आम्ही प्राप्त केलेला लेखापरीक्षण पुरावा आमच्या आर्थिक लेखापरीक्षणाच्या अभिप्रायांसाठी आधार प्रदान करण्याकरिता पुरेसा आणि योग्य आहो.

**प्रकरणाचे महत्व**

**वित्तीय निष्कर्षातील टिप्पण्यांमधील खालील बाबींवर लक्ष वेधण्यात येत आहे.**

| अ.क्र. | टिप क्र. (लेख्यावरील टिपेचा भाग २) | शेरा |
|---|---|---|
| १. | १०ब (अ)(iii) | चालू भांडवली कामे यात ३ वर्षांपेक्षा जास्त थकबाकी असलेली प्रकल्प रक्कम रु.४९७.७६ लाख (दि.३१.०३.२०२१ रोजी रु.३६२.२८ लाख) यांचा समावेश आहे. व्यवस्थापनाने असे ठरविले आहे की, पुढील वित्तीय वर्ष पूर्ण होईपर्यंत या मालमत्तांवर कोणतीही तरतूद करण्याची आवश्यकता नाही कारण यांचे काम पूर्ण होण्याची आणि त्या वापरात येण्याची कोणतीही शक्यता नाही |
| २. | ३६ | नियामक तरतुदीनुसार वस्तू व सेवाकराचे दायित्व आगाऊ मिळाल्यानंतर किंवा चलन तयार केल्यानंतर उद्भवले असले तरी कंपनीनेग्राहकांकडून आगाऊ मिळालेल्या वस्तू व सेवाकराचे दायित्व भरलेले नाही. पुढे कंपनीने वस्तू व सेवाकराच्या अशा प्रलंबित देयकांसाठी व्याज दिले / दिलेले नाही, किंवा या संदर्भात घेतलेल्या भूमिकेची पुष्टी करण्यासाठी त्यांचे कोणतेही लेखी मत नाही. चालू आर्थिक वर्षात कंपनीने ग्राहकांकडून आगाऊ रक्कम प्राप्त झालेल्या काही व्यवहारांवर वस्तू व सेवाकर भरला आहे, तथापि |

| | | |
|---|---|---|
| | | आगाऊ प्राप्त झालेल्या सर्व रकमांच्या बाबतीत ते सातत्याने केले जात नाही. |
| ३. | ३७ | कंपनीचे दि.३१ मार्च, २०२२ पर्यंत ग्राहक आणि इतरांकडे रु.११.३७ लाख शिल्लक आहेत ज्यापैकी रु.४.७५ लाख ३ वर्षापेक्षा जास्त काळासाठी थकबाकी आहेत. |
| ४. | ३९ | कंपनीने अद्यापही कंपनी कायदा, २०१३ च्या काही अनुपालनांचे पालन करणे बाकी आहे, ज्यासाठी दंड निश्चित केलेला नाही किंवा तरतूद केलेली नाही. |
| ५. | ४६ | कंपनी कायदा २०१३ च्या अनुसूची III नुसार एमएसएमई आणि नॉन एमएसएमई मध्ये व्यापारी देयकांचे विभाजन करणे आणि त्यांना उघड करणे तसेच एमएसएमई म्हणून वर्गीकरण करण्यासाठी विक्रेत्यांशी संवाद साधणे हेदेखील आवश्यक आहे. दि.३१.०३.२०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात कंपनीने त्यांच्या विक्रेत्यांशी / ग्राहकांशी केलेला असा कोणताही संवाद आम्हाला आढळला नाही. म्हणून अनुसूची III नुसार एमएसएमई आणि इतर व्यापारी देयकांमध्ये असलेले वर्गीकरण ओळखले जाऊ शकत नाही. शिवाय एमएसएमईडी कायदा, २००६ नुसार एमएसएमई वरील विक्रेत्यांना देयकावरील व्याजाचे दायित्व ४५ दिवसांहून अधिक काळ निश्चित करता येत नाही. |

उपरोक्त बाबींमध्ये आमची मते पात्र ठरत नाहीत.

**वित्तीय विवरणपत्रे आणि त्यावरील लेखापरीक्षकांच्या अहवालाव्यतिरिक्त इतर माहिती**

महामंडळाच्या इतर माहितीकरिता संचालक मंडळ व व्यवस्थापन जबाबदार आहे. तसेच इतर माहितीमध्ये या लेखापरीक्षा अहवालाच्या तारखेला मिळालेल्या माहितीचा समावेश आहे परंतु त्यात वित्तीय विवरणपत्रे आणि त्यावरील लेखापरीक्षकांचा अहवाल यांचा अंतर्भाव केलेला नाही.

असे आमचे मत आहे की, वित्तीय निष्कर्षांबाबतची इतर माहिती आणि त्यावर लेखापरीक्षणात सादर करावयाच्या माहितीचा समावेश करु शकत नाही.

आमच्या वित्तीय विवरणपत्रातील लेखापरीक्षणासंदर्भात इतर माहिती वाचणे आणि असे करताना इतर माहिती वित्तीय विवरणांशी किंवा लेखापरीक्षण करताना प्राप्त झालेल्या इतर माहितीशी भौतिकरित्या विसंगत आहे की, नाही याचा विचार करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही केलेल्या कार्याच्या आधारे आम्ही असा निष्कर्ष काढतो की, इतर माहिती भौतिक चुकीच्या पद्धतीने असल्यास आम्हाला त्या तथ्याबद्दल अहवाल देणे आवश्यक आहे. आमच्याकडे या संदर्भात अहवाल देण्यासारखे काही नाही.

**आर्थिक बाबींच्या नोंदीबाबत व्यवस्थापनाची आणि प्रशासनाची जबाबदारीः**

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३४(५) मध्ये दिलेल्या बाबींनुसार मंडळाची आर्थिक स्थिती, आर्थिक कामगिरी आणि रोखीचा ओघ खऱ्या व योग्य पद्धतीने दर्शविला जाईल अशा रितीने तसेच सामान्यतः भारतात स्वीकारलेले लेख्यांचे मूलतत्व कलम १३३ मध्ये नमूद लेखे-मानक यांना अनुसरुन आर्थिक बाबींच्या नोंदीचा अहवाल बनविण्यास मंडळाचे संचालक मंडळ जबाबदार आहे. या शिवाय या जबाबदारीमध्ये अंतर्गत कायद्यातील तरतुदीनुसार लेख्यांच्या पुरेशा नोंदी ठेवणे, मंडळाच्या मालमत्तेचे संरक्षणाकरिता फसवणूक व इतर गैरव्यवहार शोधणे व थांबविणे, योग्य ते लेखे धोरण निवडणे व लागू करणे, निर्णय घेणे, माफक आणि धोरणी अंदाज करणे, अंतर्गत आर्थिक अधिकार मर्यादेत ठेवणे व अंमलबजावणी करणे, हिशोबांच्या नोंदींची बिनचूकपणा व पूर्णता यांची खात्री करणे, जे परिणामकारकरित्या कृतीय येत होते, याच्याशी निगडीत चुका किंवा लबाडी नसलेली व खऱ्या व योग्य पद्धतीने तयार व सादर केलेली आर्थिक निवेदने यांचा समावेश होतो.

वित्तीय विवरणपत्र तयार करताना व्यवस्थापनाला महामंडळाची कार्यवाही रद्द करण्याचा किंवा थांबविण्याचा हेतु नसल्यास चालू असलेल्या बाबींची चिंता करणे, लागू होणे, जाहीर करणे, लागू असणाऱ्यासंबंधित बाबींचा विचार करणे आणि लेख्यांच्या आधाराचा विचार करणे, जोपर्यंत व्यवस्थापनाने कंपनीला काढून टाकण्याचा किंवा महामंडळाचे काम थांबविण्याचा विचार केला नाही, कंपनीच्या क्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी जबाबदार आहे. व्यवस्थापनाकडे तसे करण्याशिवाय कोणताही वास्तविक पर्याय नाही.

महामंडळाचे वित्तीय अहवाल तयार करण्याच्या प्रक्रिया बघण्याच्या कार्याकरिता महामंडळाचे संचालक मंडळ सुद्धा जबाबदार आहेत.

**लेखापरीक्षकांची जबाबदारी**

आमची उद्दिष्टे म्हणजे संपूर्ण वित्तीय विवरणपत्रे चुकीच्या घोटाळ्यापासून, फसवणुक किंवा त्रुटीपासून मुक्त आहेत की नाहीत याबाबत वाजवी आश्वासन मिळविणेआणि एखाद्या लेख्याचा अहवाल जारी करणे ज्यात आमचे मत आहे. वाजवी आश्वासन हे उच्च पातळीचे आश्वासन आहे परंतु लेखा मानकांनुसार केलेल्या लेखापरीक्षणामध्ये एखादी गोष्ट चुकीची आढळली म्हणजे ती नेहमीच आढळेल याची हमी नाही. चुकीची माहिती फसवणूक किंवा त्रुटीमुळे उद्भवू शकते किंवा वापरकर्त्यांच्या वैयक्तिकरित्या एकूणच आर्थिक विधानांच्या आधारे घेतलेल्या आर्थिक निर्णयावर त्याचा परिणाम होण्याची अपेक्षा केली जाऊ शकते.

लेखामानकानुसार लेखापरीक्षणाचा एक भाग म्हणून आम्ही व्यावसायिक निवाडा करतो आणि लेखापरीक्षणामध्ये व्यावसायिक संशयास्पदता राखत असतो.

१. वित्तीय अहवालावर अंतर्गत आर्थिक नियंत्रणाच्या मूळ मर्यादांमुळे संगनमत किंवा अयोग्य व्यवस्थापनास नियंत्रणाने अधोरेखित करण्याची शक्यता, त्रुटी किंवा फसव्या कारणास्तव गैरसमज होण्याची शक्यता आढळू शकते किंवा शोधली जाऊ

शकत नाही. तसेच भविष्यात वित्तीय अहवालावर अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचे कोणतेही मूल्यमापन करणे हे जोखमीस अधीन आहे किंवा वित्तीय अहवालावरीत अंतर्गत आर्थिक नियंत्रण अटींमध्ये बदल झाल्यास अपुरी होऊ शकतात किंवा ते धोरण किंवा प्रक्रियेच्या पूर्ततेच्या प्रमाणात कदाचित बिघडू शकतात.

२. कायदा कलम १४३(३)(i) नुसार आम्ही अहवाल देत आहोत की, आमच्या माहिती व समजुतीप्रमाणे आम्ही हिशोब तपासणीसाठी जरुर ती सर्व माहिती व स्पष्टीकरणे शोधपूर्वक मिळविली आहे. आमच्या मते आम्ही हिशोबांच्या पुस्तकांची जी तपासणी केली त्यावरुन कायद्यानुसार आवश्यक असलेली पुस्तके कंपनीने ठेवलेली आहेत.

३. हा अहवाल विचारात घेता ताळेबंद, नफा-तोटा पत्रक तयार करताना लेखांकनाची धारणा आणि पुरक लेख्यांच्या अंदाजपत्रकांचा आधार घेऊन व्यवस्थापनाने प्रकटीकरण तयार केले आहे.

४. लेखांकनाच्या सुस्थितीतील उपक्रमाच्या आधारावर व्यवस्थापनाच्या वापराच्या योग्यतेवर निष्कर्ष काढून व मिळालेल्या लेखापरीक्षण पुराव्याच्या आधारावर, घटना किंवा परिस्थितीशी संबंधित भौतिक अनिश्चितता अस्तित्वात आहे की नाही हे कपंनी चालू ठेवण्याच्या क्षमतेवर महत्वपूर्ण शंका निर्माण करु शकते. जर आम्ही असा निष्कर्ष काढला की, भौतिक अनिश्चितता अस्तित्वात आहे किंवा जर असे खुलासे अपुरे असतील तर आमचे मत सुधारण्यासाठी आम्हाला आमच्या लेखापरीक्षण अहवालात आर्थिक विवरणामधील संबंधित खुलाशांकडे लक्ष वेधून घेणे आवश्यक आहे. आमचे निष्कर्ष आमच्या लेखापरीक्षण अहवालाच्या तारखेपर्यंत मिळालेल्या लेखापरीक्षण पुराव्यावर आधारित आहेत.

५. वित्तीय विवरणांचे एकूण सादरीकरण, रचना आणि सामग्रीचे मूल्यमापन, प्रकटीकरणासह आणि आर्थिक विवरणपत्र अंतर्निहित व्यवहार आणि घटनांचे योग्य पद्धतीने प्रतिनिधीत्व करतात की नाही अशा प्रकारे योग्य सादरीकरण प्राप्त होते.

भौतिकता म्हणजे आर्थिक अहवालामधील चुकीच्या अहवालाचा परिमाण जो वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे, आर्थिक अहवालाचे वाजवी ज्ञान असलेल्या वापरकर्त्यांचे आर्थिक निर्णय प्रभावित होण्याची शक्यता निर्माण करते. १) आमच्या लेखापरीक्षणाच्या व्याप्तीचे नियोजन करणे आणि आमच्या कामाच्या परिणामांचे मूल्यमापन करणे आणि २) आर्थिक अहवालामधील कोणत्याही ओळखल्या गेलेल्या चुकीच्या विधानांच्या परिणामाचे मूल्यांकन करणे यासाठी आम्ही परिणामवाचक भौतिकता आणि गुणात्मक घटकांचा विचार करतो.

आम्ही आमच्या लेखापरीक्षणा दरम्यान ओळखल्या जाणाऱ्या अंतर्गत नियंत्रणातील कोणत्याही महत्वाच्या कमतरतांसह, अन्य बार्बीसह, लेखापरीक्षणाची नियोजित व्याप्ती, वेळ आणि महत्वपूर्ण लेखापरीक्षण निष्कर्षांबाबत, ज्यांच्यावर प्रशासनाचा आरोप आहे त्यांच्याशी आम्ही संवाद साधतो.

आम्ही असे सुद्धा विधान करतो की, आम्ही स्वातंत्र्याशी संबंधित नैतिक आवश्यकतांचे पालन केले आहे आणि आमच्या स्वातंत्र्यावर वाजवीपणे विचार केला जाऊ शकतो अशा इतर बाबी आणि जेथे लागू असेल तेथे संबंधित सुरक्षा उपायांचे पालन केले आहे.

**तर कायदेशीर आणि नियमन आवश्यकता अहवाल :**

१. कंपनी कायद्याच्या कलम १४३(५) च्या आवश्यकतेनुसार आम्ही जोडपत्र-१ मध्ये आमच्या अहवालानुसार भारताचे नियंत्रक व महालेखाकार यांनी निर्गमित केलेल्या निर्देशाप्रमाणे अहवाल सादर करीत आहे.

२. कंपनी (लेखापरिक्षण अहवाल ) ऑर्डर २०१६ ("द ऑर्डर")च्या आवश्यकतेनुसार भारत सरकारने जारी केलेल्या कायदा कलम १४३ च्या उपकलम (११) अनुसार परिशिष्ट मुद्‌दा क्र.३ व ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जोडपत्र-२ मध्ये आम्ही स्पष्टीकरण देत आहोत.

३. कायद्याच्या कलम १४३(३) नुसार आम्ही अहवाल देतो की :

**अ.** आमच्या समजुतीनुसार लेखापरिक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्हास मिळालेली आहेत.

**ब.** लेखापुस्तकाच्या परिक्षणावरुन आम्हास आढळून आले त्यानुसार आमच्या मते कंपनीने कायद्यानुसार आवश्यक असलेली सर्व लेखापुस्तके ठवेलेली आहेत.

**क.** या अहवालामध्ये निर्दिष्ट करण्यात आलेला ताळेबंद व नफातोटा पत्रकआणि रोख प्रवाह यांचा लेखापुस्तकांशी मेळ जमतो.

**ड.** आमच्या मते उपरोक्त वित्तीय विवरणे कंपनी (लेखा) नियम, २०१४ च्या नियम ७ सहपठित कायद्याचे कलम १३३ अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या लेखामानकांचे पालन करतात.

**इ.** आमच्या मते वरील "प्रकरणाचे महत्व" या परिच्छेदामध्ये वर्णन केलेल्या प्रकरणांचा कंपनीच्या कामकाजावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

**फ.** कंपनी कायदा कलम १६४(२) नुसार कोणीही संचालक दि.३१ मार्च, २०२२ रोजी संचालक म्हणून नेमण्यास अपात्र नसल्याबद्दलचे योग्य ते प्रमाणपत्र संचालकांकडून प्राप्त झाले आहे व संचालक मंडळाने त्याची नोंद घेतली आहे.

**ग.** महामंडळाच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणावरील बाबी परिणामकारकरित्या व्यवहारात उपयोगात आणताना महामंडळाच्या वित्तीय अहवालातील पुरेशा संदर्भानुसार वापरण्यात येत असून याबाबत परिशिष्ट III मध्ये सविस्तर तपशील सादर करण्यात आलेला आहे.

**ह.** कंपनी कायद्यातील कलम १९७(१६) नुसार इतर प्रकरणांचा समावेश लेखापरीक्षण अहवालात गरजेनुसार करण्यात आलेला आहे.कायद्यातील अंमलबजावणीनुसार आम्ही कायद्यातील तरतुदीत १९७ सूची V चे वाचन करुन या वर्षात महामंडळाने व्यवस्थापकीय मानधनाची तरतूद केलेली आहे तथा त्याचे प्रदान केलेले आहे.

**आय.** कंपनी (लेखापरिक्षण आणि लेखापरिक्षक) नियम २०१४ च्या नियम ११ नुसार लेखापरीक्षकांच्या अहवालात समाविष्ट करावयाच्या इतर बाबींच्या संदर्भात आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार,

१. कंपनीने आपल्या आर्थिक अहवालामध्ये अनिर्णित खटल्यांमुळे तिच्या आर्थिक स्थितीवर पडलेला प्रभाव उघड केला आहे. आर्थिक अहवालामधील टिप २३ पहा.

२. मंडळाने भविष्यात विशेष तोटे येतील असे कोणतेही दीर्घ मुदतीचे किंवा साधित सौदे केलेले नाहीत.

३. कंपनीच्या गुंतवणूकदारांचे शिक्षण व संरक्षण निधीमध्ये वर्ग करण्याची गरज होती अशा कुठल्याही रकमा नाहीत.

४.

i) व्यवस्थापनाने असे प्रतिनिधीत्व केले आहे की, त्यांच्या उत्तम ज्ञान आणि विश्वासाप्रमाणे, लिखित स्वरुपात किंवा अन्यथा नोंदवलेले असले तरी, मध्यस्थ, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे इतर व्यक्तींना किंवा संस्थांना कोणत्याही प्रकारे ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तींना किंवा संस्थांना कर्ज दिले किंवा गुंतवणूक केली असेल किंवा कंपनीच्या वतीने ("अंतिम लाभार्थी") किंवा अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा किंवा यासारखे प्रदान केले असेल असे या समजुतीसह कंपनीने परदेशी संस्थांसह ("मध्यस्थ") इतर कोणत्याही व्यक्ती किंवा संस्था यांना कोणताही निधी आगाऊ दिलेला नाही किंवा कर्ज दिलेले नाही किंवा गुंतवणूक (एकतर उधार घेतलेल्या निधीतून किंवा शेअर प्रिमियम किंवा इतर कोणत्याही स्त्रोत किंवा अशा प्रकारच्या निधीतून) केलेली नाही.

ii) व्यवस्थापनाने असे प्रस्तुत केले आहे की, त्यांच्या उत्तम ज्ञान आणि विश्वासाप्रमाणे, कंपनीला परदेशी संस्थांसह ("निधी पक्ष") कोणतीही व्यक्ती किंवा संस्थांकडून कोणताही निधी प्राप्त झालेला नाही, या समजुतीसह की, लिखित स्वरुपात किंवा अन्यथा नोंदवलेले असले तरी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, निधी देणाऱ्या पक्षाद्वारे किंवा त्यांच्या वतीने ("अंतिम लाभार्थी") किंवा त्यांच्याद्वारे ओळखल्या गेलेल्या इतर व्यक्तींना किंवा संस्थांना कोणत्याही प्रकारे ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तींना किंवा संस्थांना कर्ज दिले किंवा गुंतवणूक केली असेल किंवा कंपनीच्या वतीने किंवा अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा किंवा यासारखे प्रदान केले असेल.

iii) अशा लेखापरीक्षण प्रकियेवर आधारित ज्यांना वाजवी आणि परिस्थितीमध्ये योग्य मानले गेले होते, उपकलम (अ) आणि (ब) अंतर्गत सादरीकरणामध्ये कोणतही भौतिक चुकीचे विधान आहे असा आम्हाला विश्वास वाटावा, असे काहीही आमच्या निदर्शनास आले नाही.

५. मागील वर्षी घोषित केलेला व कंपनीने वर्षभरात प्रदान केलेला अंतिम लाभांश हा लाभांश देण्यास लागू होणाऱ्या मर्यादेपर्यंत कायद्याच्या कलम १२३ नुसार आहे.

आर्थिक अहवालाच्या टीप २(ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, कंपनीच्या संचालक मंडळाने वर्षासाठी अंतिम लाभांश प्रस्तावित केला आहे, जो आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांच्या मान्यतेच्या अधिन आहे. घोषित केलेला लाभांश हा लाभांश घोषित करण्यावर लागू होतो त्याप्रमाणात कायद्याच्या कलम १२३ नुसार आहे.

**मे. ए.पी. संझगिरी आणि कंपनी,**
**सनदी लेखापाल**
फर्म रजि.क्र.११६२९३डब्ल्यू

**अंकुश गोयल**, भागीदार
सभासद क्र. १४६०१७
ओळख क्र.22146017BFPIGQ1508

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२२

**स्वतंत्र लेखापरीक्षकांचा परिशिष्ट १**

**(आमच्या आजच्या तारखेच्या अहवालात 'इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतावरील अहवाल' या शीर्षकाखाली परिच्छेद १ मधील संदर्भास अनुसरुन)**

**दि.३१ मार्च, २०२२ ला संपलेल्या वर्षासाठी कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४३(५) अंतर्गत निर्देश**

| अ.क्र. | निर्देश | शेरा |
|---|---|---|
| 1 | आयटी प्रणालीद्वारे सर्व लेखा व्यवहारांवर प्रक्रिया करण्यासाठी कंपनीकडे यंत्रणा आहे का? असल्यास खात्यांच्या अखंडतेवर आयटी प्रणालीबाहेरील लेखा व्यवहारांच्या प्रक्रियेचे परिणाम आणि आर्थिक परिणाम, जर काही असतील तर सांगावेत. | कंपनीकडे विविध आर्थिक व्यवहारांसाठी तिला लागू केलेल्या आयटी प्रणाली, टॅली प्राईम आणि पेसॉफ्टद्वारे सर्व लेखा व्यवहारांवर प्रक्रिया करण्यासाठी एक प्रणाली आहे. जसे की, आम्ही केलेल्या तपासण्यांवर आधारित, आम्ही प्रणालीच्या बाहेर प्रक्रिया केलेले कोणतेही लेखा व्यवहार आढळले नाहीत ज्यामुळे खात्यांच्या अखंडतेवर किंवा कोणत्याही आर्थिक परिणामांवर प्रभाव टाकतील. |
| 2 | कर्जाची परतफेड करण्यात कंपनीच्या अक्षमतेमुळे विद्यमान कर्जाची पुनर्रचना करण्यात आली आहे का किंवा कर्जदाराने कंपनीला दिलेले कर्ज (उधारी) / कर्ज /व्याज माफी / निर्लेखन इत्यादी प्रकरणे आहेत काय? असल्यास, आर्थिक परिणाम सांगावेत. अशा प्रकरणांचा योग्य हिशेब घेतला जातो की नाही? (जर सावकर ही सरकारी कंपनी असेल तर हे निर्देश सावकार कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांना देखील लागू आहेत) | कंपनीच्या संबंधित नोंदी आणि व्यवस्थापनाकडून मिळालेल्या माहितीच्या आणि स्पष्टीकरणाच्या आधारे कर्जदाराने कंपनीला दिलेली कर्जे / कर्ज / व्याज इत्यादींची पुनर्रचना / माफी / निर्लेखन इ. नाही. |
| 3 | केंद्र / राज्य सरकार किंवा त्यांच्या एजन्सीकडून विशिष्ट योजनांसाठी मिळालेला / प्राप्य असलेला निधी (सहाय्य/अनुदान इ.) त्याच्या अटी व शर्तीनुसार योग्यरीतीने जमा करण्यात / वापरण्यात आला होता का? विचलन प्रकरणांची यादी करा. | कंपनीला जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई जिल्हा उपनगर यांच्याकडून २०१७ मध्ये संरक्षक भिंत बांधण्यासाठी रु.४.०० कोटीचे अनुदान प्राप्त झाले आहे. हे काम रमेश अँड असोसिएट्सना रु.३.४७ कोटी रुपयांना वाटप करण्यात आले आहे, त्यानुसार अनुदानाच्या अटी व शर्तीनुसार उर्वरित रक्कम जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई जिल्हा यांना परत करावी लागेल. कंपनीने माहिती दिल्याप्रमाणे बांधकाम अद्याप पूर्ण न झाल्याने प्रलंबित आहे. |

**मे. ए.पी. संझगिरी आणि कंपनी,**
**सनदी लेखापाल**
फर्म रजि.क्र.११६२९३डब्ल्यू

**अंकुश गोयल**, भागीदार
सभासद क्र. १४६०१७
ओळख क्र.22146017BFPIGQ1508

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२२

**महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या दि.१७ नोव्हेंबर, २०२२ रोजीचे स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या अहवालाचे परिशिष्ट**

**दि.३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षासाठी कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४३(५) अंतर्गत उप निर्देश**

| अ.क्र. | उप निर्देश | शेरा |
|---|---|---|
| १ | भारतीय रिझर्व बँकेने दिलेल्या खालील निर्देशाप्रमाण कंपनीने पालन केले आहे का ?<br>• बँका नसलेल्या वित्तीय संस्था (NBFCs)<br>• कार्यात नसलेलेमालमत्तेचे वर्गीकरण<br>• बँका नसलेल्या वित्तीय संस्थांकरिता (NBFCs)भांडवलाचे पुरेसे नियम | व्यवस्थापनाद्वारे प्रदान केलेल्या माहिती, स्पष्टीकरण आणि सादरीकरणानुसार चालू वर्षाच्या कालावधीत सदर उप निर्देश कंपनीस लागू होत नाहीत. |
| २ | ज्या कंपनीकडे सुनिश्चित कर्जाची यंत्रणा आहे अशा कंपनीचे गहाणखत मालमत्तेवर ठेवताना प्रथमतः अधिभार सुरक्षा मुक्त असावे.जप्त केलेल्या घटकांच्या विल्हेवाटीचे पुढील अनुचित कारणे नोंदवता येतील. | व्यवस्थापनाद्वारे प्रदान केलेल्या माहिती, स्पष्टीकरण आणि सादरीकरणानुसार चालू वर्षाच्या कालावधीत सदर उप निर्देश कंपनीस लागू होत नाहीत. |
| ३ | कंपनी / शासनाच्या धोरणांची / मार्गदर्शक तत्वांची पूर्तता करण्याकरिता त्यास थकीत रकमेचे विस्तार करणे तसेचसमायोजन करण्यासाठीच्या योजनेचेपालन केले आहे का ? | व्यवस्थापनाद्वारे प्रदान केलेल्या माहिती, स्पष्टीकरण आणि सादरीकरणानुसार चालू वर्षाच्या कालावधीत सदर उप निर्देश कंपनीस लागू होत नाहीत. |
| ४ | कंपनीने व्यापारी येणी, व्यापारी देयके, मुदत ठेवी आणि रोख रक्कम व बँकेतील शिल्लक याबाबतचेप्रमाणपत्र निश्चिती करण्याकरिता प्राप्त करण्यात आली आहे का? | कपंनीने व्यापारी येणी व व्यापारी देय रकमेच्या शिल्लकीचे निश्चिती करण्याकरिता प्रमाणपत्र मागविलेले नाही.<br>मुदत ठेवींचे आणि बँक खात्यातील शिल्लकीचे निश्चितीकरण कंपनीकडून प्राप्त झाले आहेत. |
| ५ | लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेला नफा / तोटा कंपनीच्या नफा / तोटा पत्रकाप्रमाणे आहे का ? | होय, लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेला नफा / तोटा कंपनीच्या नफा / तोटा पत्रकाप्रमाणे आहे |
| ६ | महाराष्ट्र शासनास देय असलेल्या मुद्दल रकमेच्या व्याजाची तरतूद कंपनीने केली आहे का ? | आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार अशी कोणतीही प्रकरणे नाहीत जिथे महाराष्ट्र शासनाला देय असलेल्या मुद्दल रकमेवर व्याज देण्याची तरतूद करण्यात आली नव्हती. |
| 7 | कंपनी कायदा २०१३ च्या सूची ३ नुसार भाग अर्ज निधीचे प्रलंबित भाग वाटप विभक्तपणे / स्वतंत्रपणे भागभांडवल म्हणून दर्शविले आहे का? | चालू वर्षाच्या कालावधीत सदर उप निर्देश कंपनीस लागू होत नाहीत. सदर वर्षात कोणत्याही प्रकारचे भाग अर्ज निधी प्राप्त झालेले नाही |

| अ.क्र. | उप निर्देश | शेरा |
|---|---|---|
| 8 | प्रवर्तक / महाराष्ट्र शासनाकडून किती वर्षापासून भाग भांडवल नियमितपणे भाग अर्ज निधीच्या शीर्षकाखाली दाखविण्याचे कारण आणि टिप्पण्या वैधानिक लेखापरीक्षकांनी त्यांच्या अहवालात समाविष्ट केल्या आहेत का? | चालू वर्षाच्या कालावधीत सदर उप-निर्देश कंपनीस लागू होत नाहीत. सदर वर्षात कोणत्याही प्रकारचे भाग अर्ज निधी प्राप्त झालेले नाही. |
| 9 | महामंडळाच्या सामाजिक जबाबदारीच्या क्रियाकलापांचा अहवाल आणि प्रकटीकरण या संदर्भात कंपनी कायद्यातील तरतुदींचे पालन केले गेले किंवा नाही हे तपासा. | टिप्पणी ५१(ग) ची नोंद घेण्यासाठी संदर्भ आमंत्रित केले गेले आहेत ज्यामध्ये महामंडळाने वित्तीय वर्ष २०१९-२० ते २०२१-२२ साठी महामंडळाच्या लेखा पुस्तकांमध्ये सामाजिक जबाबदारीकरिता केलेल्या तरतुदीच्या विरुद्ध महामंडळाने सामाजिक जबाबदारीच्या क्रियाकलापांसाठी कोणतीही रक्कम खर्च केली नाही हे लक्षात घेऊन महामंडळाचे सामाजिक जबाबदारीचे एकूण रु.२,२१,०९,६५७/- चे दायित्व "खर्च न केलेले महामंडळाचे सामाजिक जबाबदारीचे खाते" या वेगळ्या बँक खात्यामध्ये हस्तांतरीत करावयाचे आहे. |

**मे. ए.पी. संझगिरी आणि कंपनी,**
**सनदी लेखापाल**
फर्म रजि.क्र.११६२९३डब्ल्यू

**अंकुश गोयल**, भागीदार
सभासद क्र. १४६०१७
ओळख क्र. 23146017BGXLDA7771

ठिकाण : मुंबई
दिनांक : २३ जानेवारी, २०२३

**स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अनुसूची २**

**दि.३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाच्या आर्थिक विवरणांवर कंपनीच्या सदस्यांना सम तारखेच्या आमच्या अहवालाच्या इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकता विभागातील परिच्छेद क्र.१ मध्ये संदर्भित परिशिष्टाच्या संदर्भात, आम्ही अहवाल देतो की,**

१. (अ) (i) कंपनीने मालमत्तेचे संख्यात्मक तपशील आणि मालमत्तेची स्थिती, यंत्र आणि उपकरणे यासह संपूर्ण तपशील दर्शविणारे योग्य दस्तऐवज ठेवलेले नाहीत.

(ii) कंपनीने अमूर्त मालमत्तेचे संपूर्ण तपशील दर्शविणारे योग्य दस्तऐवज ठेवले आहेत.

(ब) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार वर्षभरात व्यवस्थापनाने स्थिर मालमत्तेची पडताळणी केलेली नाही.

(क) मालमत्ता, संयंत्र आणि उपकरणे आणि गुंतवणूक मालमत्तेमध्ये समाविष्ट असलेल्या आर्थिक विवरणाच्या टीप १० मध्ये उघड केलेल्या स्थावर मालमत्तेचा शीर्षक लेखी करारनामा (टायटल डीड) कंपनीच्या नावावर आहे.

(ड) कंपनीने दि.३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षात तिची मालमत्ता, यंत्र आणि उपकरणे (वापरण्याच्या अधिकारासह) किंवा अमूर्त मालमत्तेचे पुनर्मूल्यांकन केलेले नाही.

(इ) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार बेनामी मालमत्ता व्यवहार प्रतिबंधक कायदा, १९८८ आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांखाली कोणतीही बेनामी मालमत्ता ठेवण्यासाठी कंपनीविरुद्ध कोणतीही कार्यवाही सुरु केलेली नाही किंवा प्रलंबित आहे.

२. (अ) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार व्यवस्थापनाने अहवालाधीन वर्षात भांडाराची सूची व भंगाराची वेळोवेळी प्रत्यक्ष पडताळणी केलेली आहे. आमच्या मते व्यवस्थापनाद्वारे पडताळणीची वारंवारता वाजवी आहे आणि अशा पडताळणीसाठी कव्हरेज आणि प्रक्रिया योग्य आहे आणि लेखा पुस्तकांसोबत तुलना केली असता यादींच्या अशा भौतिक पडताळणीवर प्रत्येक वर्गाच्या यादीत १०% किंवा त्याहून अधिक तफावत आढळून आली नाही.

(ब) कंपनीला चालू मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या आधारावर बँका किंवा वित्तीय संस्थांकडून एकूण रु.५.०० कोटीपेक्षा जास्त भांडवल मर्यादा मंजूर करण्यात आलेली नाही. त्यानुसार, आदेशाच्या २(ब) च्या तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत.

३. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार महामंडळाने कंपनी अधिनियम कलम १८९ अंतर्गत नोंद असलेल्या कोणत्याही कंपनी, फर्म किंवा मर्यादित देयता भागीदार किंवा इतर पक्षकारास कंपनीने वर्षभरात कोणतीही हमी किंवा सुरक्षा दिली नाही किंवा कोणतीही कर्जे दिली नाहीत किंवा कोणतीही गुंतवणूक केली नाही, त्यामुळे आदेशाच्या उपकलम ३(अ) ते (फ) कंपनीला लागू नाही.

४. आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार कंपनीने वर्षभरात कर्ज दिलेले नाही, गुंतवणूक केली नाही किंवा हमी आणि सुरक्षा दिली नसल्याने कंपनी अधिनियम कलम १८५ आणि १८६ च्या तरतुदी महामंडळास आवश्यक नाहीत.

५. एक वर्षाहून अधिक काळ समायोजित न होता / अदेय पडून असलेल्या ग्राहकांकडून स्वीकारलेल्या ठेवींच्या संदर्भात कंपनीने कलम ७३ व ७६ च्या तरतुदींचे पालन केले नाही किंवा कंपनी कायदा २०१३ आणि कंपनी (ठेवी स्वीकारणे) नियम २०१४ मधील सुधारित तरतुदींचे पालन केले नाही.

६. केंद्र सरकारने कंपनी कायदा २०१३ चे कलम १४८(१) अंतर्गत कंपनीद्वारे प्रदान केलेल्या कोणत्याही सेवांसाठी खर्चाच्या नोंदी ठेवण्याचे विहित केलेले नाही.

७. a) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसारमहामंडळाने योग्य प्रणालींना लागू असलेली भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर, विक्रीकर, सेवाकर, सीमाशुल्क, अबकारी शुल्क, मूल्यवर्धित कर यांसह अविवादित वैधानिक देयक भरण्यात सहसा नियमित आहे. खालील प्रकरणे वगळता उपरोक्त वैधानिक थकबाकीबद्दल देय असणारी कोणतीही अविवादीत रक्कम वित्तीय वर्षाच्या ज्या तारखेपासून ते पुढील अनुषंगाने देय होते त्या तारखेच्या शेवटच्या दिवशी सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी राहिली होती.

| कायद्याचे नाव | देयकाचे स्वरुप | रक्कम (रुपयात) | संबंधित कालावधी | विहित तारीख | देयकाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम , १९८१ | रजा वेतन योगदान | ९१,००० | वित्तीय वर्ष २०१५-१६ | विविध तारखा | अदा न केलेले |
| महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ | पेन्शन योगदान | १,३६,५०० | वित्तीय वर्ष २०१५-१६ | विविध तारखा | अदा न केलेले |

(b) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसारवाद असलेल्या व भरणा न केलेल्याखालील आयकर देयकांशिवाय आयकर, विक्री कर, सेवा कर, सीमाशुल्क, अबकारी शुल्क, मूल्यवर्धित कर यांचेदेय बाकी नाही.

| कायद्याचे नाव | देयकाचे स्वरुप | रक्कम (रुपयात) | संबंधित कालावधी | विवाद जिथे प्रलंबित आहे ते न्यायाधिकरण |
|---|---|---|---|---|
| आयकर कायदा, १९६१ | आयकर | ८,२३,२७४ | कर निर्धारण वर्ष २००७-०८ | आयकर आयुक्त (अपिल) |
| आयकर कायदा, १९६१ | आयकर | ७,९३,३२७ | कर निर्धारण वर्ष २००८-०९ | आयकर अपिलेट न्यायाधिकरण |
| आयकर कायदा, १९६१ | आयकर | ३,९८,३८,९६७ | कर निर्धारण वर्ष २००९-१० | आयकर अपिलेट न्यायाधिकरण |
| आयकर कायदा, १९६१ | आयकर | ३०,१५,५१० | कर निर्धारण वर्ष २०११-१२ | आयकर अपिलेट न्यायाधिकरण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आयकर कायदा, १९६१ | आयकर | ९,१०,४६५ | कर निर्धारण वर्ष २०१२-१३ | आयकर आयुक्त (अपिल) |
| आयकर कायदा, १९६१ | आयकर | २,३४,९९,८२८ | कर निर्धारण वर्ष २०१३-४ | आयकर आयुक्त (अपिल) |
| आयकर कायदा, १९६१ | आयकर | ७५,७०,७९६ | कर निर्धारण वर्ष २०१४-१५ | आयकर आयुक्त (अपिल) |
| आयकर कायदा, १९६१ | आयकर | १,५२,३०,१२७ | कर निर्धारण वर्ष २०१७-१८ | आयकर आयुक्त (अपिल) |
| आयकर कायदा, १९६१ | आयकर | ३०,११,३०१ | कर निर्धारण वर्ष २०१८-१९ | आयकर आयुक्त (अपिल) |

८. कंपनीने वर्षभरातील उत्पन्न म्हणून प्राप्तीकर कायदा, १९६१ अंतर्गत कर मूल्यांकनामध्ये, खात्याच्या पुस्तकांमध्ये यांपूर्वी नोंद न केलेला कोणताही व्यवहार समर्पण किंवा उघड केलेला नाही. त्यानुसार, आदेशाचे उपकलम ३ (viii) वर अहवाल देण्याची आवश्यकता कंपनीला लागू नाही.

९. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार कंपनीने बँक, वित्तीय संस्था किंवा कर्जरोख्यांद्वारे कोणतेही कर्ज किंवा उसने घेतलेले नाही. त्यानुसार, आदेशाचे उपकलम ३(ix) वर अहवाल देण्याची आवश्यकता कंपनीला लागू नाही.

१०. (अ) कंपनीने वर्षभरात प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (ऑफर) किवा पुढील सार्वजनिक ऑफर (कर्ज साधने समाविष्ट करुन) द्वारे कोणताही निधी उभा केलेला नाही म्हणून आदेशाचे उपकलम ३ (x) (अ) वर अहवाल देण्याची आवश्यकता कंपनीला लागू नाही.

(ब) कंपनीने लेखापरीक्षणांतर्गत वर्षभरात समभाग / पूर्णतः किंवा अंशतः किंवा वैकल्पिकरित्या परिवर्तनीय कर्जरोख्यांचे कोणतेही प्राधान्य वाटप किंवा खाजगी प्लेसमेंट केलेले नाही आणि म्हणून आदेशाचे उपकलम ३ (x) (ब) वर अहवाल देण्याची आवश्यकता कंपनीला लागू नाही.

११. (अ) वर्षभरात कंपनीद्वारे किंवा कंपनीकडून कोणतीही फसवणूक झाल्याचे लक्षात आले नाही किंवा नोंदवले गेले नाही.

(ब) वर्षभरात कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३ च्या उपकलम १२ अंतर्गत कोणताही अहवाल सचिविय लेखापरीक्षकांनी किंवा आमच्याद्वारे फॉर्म ADT-४ मध्ये केंद्र सरकारचे कंपनी नियम (लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षक), २०१४ च्या नियम १३ अंतर्गत विहित केल्यानुसार दाखल केलेला नाही.

(क) व्हिसल ब्लोअर यंत्रणेची स्थापना कंपनीला लागू नाही म्हणून परिच्छेद ३ (x) (क) अंतर्गत अहवाल कंपनीला लागू नाही.

१२. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ४०६ अंतर्गत विहित केलेली कंपनी ही निधी कंपनी नाही. त्यानुसार आदेशाचा परिच्छेद ३(xii) कंपनीला लागू नाही.

१३. आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार संबंधित पक्षांसोबतचे सर्व व्यवहार कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १७७ आणि १८८ चे पालन करत आहेत आणि लागू लेखा मानकांद्वारे आवश्यक असलेल्या वित्तीय विवरणांमध्ये तपशील उघड केले आहेत.

१४. अ) कंपनीकडे अंतर्गत लेखापरीक्षण प्रणाली आहे परंतु ती तिच्या आकार आणि स्वरुपाशी सुसंगत नाही.

ब) लेखापरीक्षण अहवालाच्या तारखेपर्यंत जारी केलेले कंपनीचे लेखापरीक्षण अहवाल, लेखापरीक्षणाखालील कालावधीसाठी आम्ही विचारात घेतले आहेत.

१५. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार आणि कंपनीच्या नोंदीच्या आमच्या तपासणीच्या आधारे, कंपनीने संचालक किंवा त्यांच्याशी संबंधित व्यक्तींसोबत रोख नसलेले व्यवहार केलेले नाहीत. त्यानुसार आदेशाचा परिच्छेद ३(xv) कंपनीला लागू नाही.

१६. अ) भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) उपकलम ४५-IA च्या तरतुदी कंपनीला लागू नाहीत. त्यानुसार, आदेशाचे उपकलम ३ (xvi)(अ) वर अहवाल देण्याची आवश्यकता कंपनीला लागू नाही.

ब) कंपनीने कोणत्याही नॉन बँकींग वित्तीय किंवा गृहनिर्माण वित्तविषयक क्रियाकलापांमध्ये गुंतलेली नाही. त्यानुसार, आदेशाचे उपकलम ३३ (xvi)(ब) वर अहवाल देण्याची आवश्यकता कंपनीला लागू नाही.

क) भारतीय रिझर्व्ह बँकेने केलेल्या नियमामध्ये परिभाषित केल्यानुसार कंपनी ही मूळ गुंतवणूक कंपनी नाही. त्यानुसार, आदेशाचे उपकलम ३ (xvi)(क) वर अहवाल देण्याची आवश्यकता कंपनीला लागू नाही.

ड) समूहाचा एक भाग म्हणून कंपनी न्कोणतीही मुख्य गुंतवणूक कंपनी नाही, म्हणून आदेशाचे उपकलम ३ (xvi)(ड) वर अहवाल देण्याची आवश्यकता कंपनीला लागू नाही.

१७. कंपनीला चालू वर्षात आणि लगतच्या आधीच्या आर्थिक वर्षात अनुक्रमे रोख तोटा झालेला नाही.

१८. वर्षभरात वैधानिक लेखापरीक्षकांनी राजीनामा दिलेला नाही आणि त्यानुसार, आदेशाचे उपकलम ३ (xviii) वर अहवाल देण्याची आवश्यकता कंपनीला लागू नाही.

१९. टीप क्र.५२ मध्ये प्रकट केलेल्या आर्थिक गुणोत्तराच्या आधारावर स्वतंत्र वित्तीय विवरणपत्र, वाढ आणि आर्थिक मालमत्तेच्या प्राप्तीच्या अपेक्षित तारखा आणि आर्थिक दायित्वांची अदायगी, आर्थिक अहवालासह इतर माहिती, संचालक मंडळ आणि व्यवस्थापन योजनांबद्दलचे आमचे ज्ञान आणि गृहितकांना समर्थन देणाऱ्या आमच्या तपासणीच्या आधारे, आमच्या ध्यानात असे काहीही आले नाही, ज्यामुळे आम्हाला असे वाटते की, लेखापरीक्षण अहवालाच्या तारखेपर्यंत कोणतीही भौतिक अनिश्चितता अस्तित्वात आहे की कंपनी ताळेबंदाच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत जेव्हा आणि जेव्हा ते देय होतात तेव्हा ताळेबंदाच्या तारखेला विद्यमान दायित्व पूर्ण करण्यास सक्षम नाही. तथापि, आम्ही असे सांगतो की, हे कंपनीच्या भविष्यातील व्यवहार्यतचे आश्वासन नाही. आम्ही पुढे असे सांगतो की, आमचा अहवाल लेखापरीक्षण अहवालाच्या तारखेपर्यंतच्या तथ्यांवर आधारित आहे आणि आम्ही कोणतीही हमी देत नाही किंवा कोणतेही आश्वासन देत नाही की ताळेबंद तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीत देय असलेल्या सर्व दायित्वांचे जेव्हा ते देय होतात तेव्हा निर्मूलन केले जाईल.

२०. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार आणि आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे कंपनीने सामाजिक दायित्वाची (CSR) रक्कम खर्च केलेली नाही, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे -

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | खर्च न केलेली सामाजिक दायित्वाची (CSR) रक्कम | आर्थिक वर्ष समाप्तीपासून ६ महिन्यांच्या आत अनुसूची VII मधील निर्दिष्ट निधीमध्ये हस्तांतरीत केलेली रक्कम* | देय तारखेनंतर हस्तांतरीत केलेली रक्कम (ठेवीची तारीख निर्दिष्ट करा)* |
|---|---|---|---|---|
| १ | २०१८-१९ | १९,२७७ | - | - |
| २ | २०१९-२० | ७०,९९,६३५ | - | - |
| ३ | २०२०-२१ | ७७,१९,४६० | - | - |
| ४ | २०२१-२२ | ७२,७१,२८५ | - | - |

कंपनीद्वारे कोणत्याही शेड्युल्ड बँकेत उघडले जाणारे विशेष खाते ज्याला खर्च न केलेले कॉर्पोरेट सामाजिक दायित्व खाते (५१(ग) पहा) म्हंटले जाईल अशा खात्यावर या वित्तीय वर्षासाठी वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून तीस दिवसांच्या कालावधीत कंपनीने अहवालाच्या तारखेपर्यंत कोणतीही रक्कम हस्तांतरीत केलेली नाही.

२१. कंपनीला एकत्रित वित्तीय अहवाल सादर करणे आवश्यक नाही आणि त्यामुळे आदेशाचा परिच्छेद क्र.३ (xxi) लागू होणार नाही.

**मे. ए.पी. संझगिरी आणि कंपनी,**
**सनदी लेखापाल**
फर्म रजि.क्र.११६२९३डब्ल्यू

**अंकुश गोयल**, भागीदार
सभासद क्र. १४६०१७
ओळख क्र.22146017BFPIGQ1508

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२२

**सूची - ३**

**स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल**

**(महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादितच्या सदस्यांना सम तारखेच्या आमच्या अहवालाच्या 'इतर कायदेशीर आणि नियमाक आवश्यकतांवर अहवाल' या शीर्षकाखाली परिच्छेद ४(फ) मध्ये संदर्भित)**

**कंपनी अधिनियम, २०१३("कायदा") च्या कलम १४३ मधील उप कलम ३ च्या कलम (i) अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अहवाल**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादितचा (कंपनी) ३१ मार्च, २०२२ या तारखेला संपलेल्या वर्षासाठी महामंडळाच्या वित्तीय अहवालाच्या लेखापरीक्षणानंतर वित्तीय अहवालातील अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचे आम्ही लेखापरीक्षण केले आहे.

**अंतर्गत आर्थिक नियंत्रणाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :**

महामंडळाचे व्यवस्थापन अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापन करण्यासाठी आणि त्यांचे पालन करण्यासाठी जबाबदार आहे, भारताचे सनदी लेखापालांच्या संस्थेद्वारे जारी केलेल्या मार्गदर्शन टिप्पणीमध्ये नमूद केले आहे की, आर्थिक अहवालांच्या आधारावर अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे लेखापरीक्षण करताना मार्गदर्शक सूचनांमध्ये अंतर्भूत केलेले अंतर्गत नियंत्रणांचे घटक विचारात घेणे आवश्यक आहे. या शिवाय या जबाबदारीमध्ये कंपनी  कायदा, २०१३ च्या तरतुदीनुसार लेख्यांच्या पुरेशा नोंदी ठेवणे, मंडळाच्या मालमत्तेचे संरक्षणाकरिता फसवणूक व इतर गैरव्यवहार शोधणे व थांबविणे, योग्य ते लेखे धोरण निवडणे व लागू करणे, निर्णय घेणे, माफक आणि धोरणी अंदाज करणे, अंतर्गत आर्थिक अधिकार मर्यादेत ठेवणे व अंमलबजावणी करणे, हिशोबांच्या नोंदींची बिनचूकपणा व पूर्णता यांची खात्री करणे, जे परिणामकारकरित्या कृतीय येत होते, याच्याशी निगडीत चुका किंवा लबाडी नसलेली व खऱ्या व योग्य पद्धतीने तयार व सादर केलेली आर्थिक निवेदने यांचा समावेश होतो.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी :**

आमच्या लेखापरिक्षणानुसार वित्तीय अहवालावर महामंडळाच्या अंतर्गत आर्थिक नियंत्रणावरील मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.आयसीएआयद्वारे जारी केलेल्या आर्थिक अहवालाच्या ("मार्गदर्शक सूचना") व लेखापरीक्षण मानके आणि कपंनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३(१०) अंतर्गत निर्धारित केल्यानुसार वित्तीय नियंत्रणांचे लेखापरीक्षण करण्यासाठी लागू असलेल्या मर्यादेपर्यंत,आणि दोन्हींच्या अंतर्गत भारतीय सनदी लेखापालांच्या संस्थेने जारी केलेल्या लेखापरिक्षण मानकदंडानुसार आम्ही आमचे लेखापरिक्षण सादर केले आहे.या मानकदंडाच्या अपेक्षेनुरुप आम्ही नैतिक जबाबदारी स्वीकारुन आर्थिक पत्रके व माहितीमध्ये कोणतीही चुकीची विधाने केलेली नाहीत याची जरुर ती खात्री करुन लेखापरिक्षण करणे गरजेचे आहे.  त्या मानकदंडानुसार आणि मार्गदर्शक टिप्पणीनुसार अंतर्गत आर्थिक अहवालावर पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित केली आहेत आणि ती काळजीपर्वूक लागू केली आहेत आणि अशा नियंत्रणास सर्व भौतिक गोष्टींमध्ये प्रभावीरित्या कार्यरत असल्याबद्दल वाजवी हमी प्राप्त करण्यासाठी नैतिक आवश्यकतांची पूर्तता करणे, योजना तयार करणे आणि लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे.

आमच्या लेखापरीक्षणात आर्थिक अहवाल आणि त्यांच्या कार्यकुशलतेंतर्गत आर्थिक नियंत्रण प्रणालीच्या पर्याप्ततेबद्दल लेखापरीक्षण पुरावा प्राप्त करण्यासाठीच्या प्रक्रियांचा समावेश आहे.आर्थिक अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे आमचे लेखापरीक्षण वित्तीय अहवालांतर्गत आर्थिक नियंत्रणांची समज प्राप्त करणे, भौतिक अशक्तपणा अस्तित्वात असणाऱ्या जोखमींचे मूल्यांकन करणे, आणि मूल्यमापन केलेल्या जोखमीवर आधारित डिझाईनचे परीक्षण आणि मूल्यमापन करणे आणि अंतर्गत नियंत्रणांचे संचालन करणे,  निवडलेल्या कार्यपद्धती अंकेक्षण निर्णयाच्या आधारावर, वित्तीय अहवालाच्या भौतिक चुकांच्या जोखीमांचे मूल्यांकन, फसवणुक किंवा त्रुटींमुळे होणारे निर्धारण यावर अवलंबून आहे.

आमचा असा विश्वास आहे की, आम्हाला मिळालेले लेखापरीक्षण पुरावे कंपनीच्या वित्तीय अहवालातील अंतर्गत आर्थिक नियंत्रण प्रणालीवरील आमच्या लेखापरीक्षणाच्या अभ्यासाकरिता आधार प्रदान करण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहेत.

**आर्थिक अहवालांतर्गत अंतर्गत आर्थिक नियंत्रणाचा अर्थ:**

वित्तीय अहवालावर कंपनीचे अंतर्गत आर्थिक नियंत्रण वित्तीय अहवालांची विश्वासार्हता आणि सामान्यतः स्वीकारलेल्या लेखा नियमांनुसार आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी वाजवी आश्वासन देण्याकरिता तयार केलेली एक प्रक्रिया आहे.आर्थिक अहवालावर कंपनीचे अंतर्गत आर्थिक नियंत्रणात त्या धोरणांचा आणि प्रक्रियांचासमावेश आहे, १) कंपनीच्या मालमत्तेचे व्यवहार आणि व्यवहार दर्शविणारे उचित तपशील, अचूकपणे आणि प्रामाणिकपणे नोंद ठेवण्यासंबंधी अभिलेखांची देखभाल करणे २) सामान्यतः स्वीकारलेल्या लेखाविषयक तत्वांनुसार वित्तीय अहवाल तयार करण्याच्या परवानगीसाठी आवश्यक असलेल्या व्यवहारांची नोंद केली जाते आणि कंपनीची प्राप्ती व खर्च केवळ कंपनीच्या व्यवस्थापनास आणि संचालक मंडळाच्या अधिकृततेनुसारच देण्यात येत आहेत आणि ३) वित्तीय अहवालावरील भौतिक परिणाम असलेल्या कंपनीच्या मालमत्तेचे अनधिकृत संपादन, वापर किंवा सुव्यवस्था राखण्याचा किंवा वेळेनुसार ओळखण्याबाबत वाजवी हमी पदान करणे.

**आर्थिक अहवालांतर्गत अंतर्गत आर्थिक नियंत्रणाची मूळ मर्यादा :**

वित्तीय अहवालावर अंतर्गत आर्थिक नियंत्रणाच्या अंतर्निहित मर्यादांमुळे संगनमत किवा अयोग्य व्यवस्थापनास नियंत्रणाने अधोरेखित करण्याची शक्यता, त्रुटी किंवा फसव्या कारणास्तव गैरसमज होण्याची शक्यता आढळू शकते किंवा शोधली जाऊ शकत नाही. तसेच भविष्यात वित्तीय अहवालावर अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचे कोणतेही मूल्यमापन करणे हे जोखमीस अधीन आहे की, वित्तीय अहवालावरील अंतर्गत आर्थिक नियंत्रण परिस्थितीमध्ये बदल झाल्यास अपुरी पडू शकतात किंवा ते धोरण किंवा प्रक्रियेच्या पूर्ततेच्या प्रमाणात कदाचित बिघडू शकतात.

**सशर्त मत :**

आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार आणि आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे दि.३१ मार्च, २०२२ रोजी महत्वाचा कमकुवतपणा ओळखला गेला आहे.

अ) कंपनीकडे नुकसान वसुलीसाठी योग्य अंतर्गत नियंत्रण प्रणाली नाही, पक्षांद्वारे विलंबित भुगतानावरील व्याज (करारानुसार), भाडेकराराद्वारे सबलेटिंग, पर्यटन शुल्काची गणना, उत्पन्नासाठी प्राप्त होणारे विद्युत शुल्क, ज्यामुळे उत्पन्न तसेच पुनर्प्राप्ती यांची संभाव्यतः कमी ओळख होऊ शकते.

ब) कंपनीकडे मनुष्यबळ आणि हजेरीकरिता वेतन धोरण आणि माहिती सामायिक करण्यासाठी पुरेशी अंतर्गत प्रणाली नाही. यामुळे कर्मचाऱ्यांच्या फायद्याच्या खर्चासाठी जादा खर्च होण्याची शक्यता आहे आणि वैयक्तिक ईमेल आयडी कामासाठी वापरल्यामुळे कंपनीची गोपनियता गमावणे, ग्राहकांच्या गोपनीयतेचे उल्लंघन इत्यादी धोका निर्माण होऊ शकतो.

क) कंपनीकडे स्थिर मालमत्ता लेबलिंग, भंगार मालमत्ता आणि बदललेल्या मालमत्तेसाठी योग्य अंतर्गत नियंत्रण प्रणाली नाही ज्यामुळे मालमत्तेची चोरी, मालमत्तेची देखभाल नसणे, कार्यक्षमता कमी होणे इ. स्थापित मशिनरी वापरावर नियंत्रण नसल्यामुळे आणि काम पूर्ण करण्यासाठी निधी आणि मानवी हस्तक्षेप यामुळे अनावश्यक गुंतवणूक होऊ शकते.

ड) कंपनीकडे नियामक अहवाल सादर करण्यासाठी आणि एमसीए, जीएसटी अनुपालनाशी संबंधित फाइलिंगसाठी योग्य अंतर्गत नियंत्रण प्रणाली नाही, ज्यामुळे आर्थिक नुकसान होऊ शकते, संचालकांना अपात्र ठरवले जाऊ शकते, व्याज / दंड तरतूद, अल्प तरतूद, त्याच्या संदर्भात आकस्मिक दायित्वांचे अपुरे प्रकटीकरण याला कंपनी जबाबदार आहे.

महत्वाचा कमकुवतपणा म्हणजे वित्तीय अहवालावरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणातील कमतरता किंवा कमतरतेचे एकीकरण, जसे की कंपनीच्या वार्षिक किंवा अंतरिम आर्थिक विवरणामधील महत्वाचे चुकीचे विधान वेळेवर रोखले जाणार नाही किंवा शोधले जाणार नाही याची वाजवी शक्यता आहे.

आमच्या मते कंपनीने दि.३१ मार्च, २०२२ पर्यंत आर्थिक अहवालावर पुरेशी अंतर्गत आर्थिक नियंत्रणे ठेवली आहेत, जी कंपनीने स्थापन केलेल्या आर्थिक अहवाल निकषांवरील अंतर्गत नियंत्रणावर आधारित आहेत, भारताच्या सनदी लेखापाल संस्थेने जारी केलेल्या आर्थिक अहवालावरील वित्तीय नियंत्रणाच्या लेखापरीक्षणावरील मार्गदर्शक सूचना आणि नियंत्रण निकषांच्या उद्दिष्टांच्या साध्यतेवर उक्त वर्णन केलेल्या कमकुवतपणाचे संभाव्य परिणाम वगळता, कंपनीचे आर्थिक अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रण दि.३१ मार्च, २०२२ पर्यंत प्रभावीपणे कार्यरत होते.

कंपनीच्या दि.३१ मार्च, २०२२ च्या आर्थिक अहवालाच्या आमच्या लेखापरीक्षणामध्ये लागू केलेल्या लेखापरीक्षणाचे स्वरुप, वेळ आणि व्याप्ती ठरविण्यासाठी आम्ही वर ओळखल्या गेलेल्या आणि नोंदवलेल्या कमकुवतपणाचा विचार केला आहे आणि या कमकुवतपणाचा कंपनीच्या आर्थिक अहवालावरील आमच्या मतावर परिणाम होत नाही.

**मे. ए.पी. संझगिरी आणि कंपनी,**
**सनदी लेखापाल**
फर्म रजि.क्र.११६२९३डब्ल्यू

**अंकुश गोयल**, भागीदार
सभासद क्र. १४६०१७
ओळख क्र.22146017BFPIGQ1508

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२२

भारतीय लेखापरीक्षा और लेखा विभाग
Indian Audit and Accounts Department
महालेखाकार (लेखापरिक्षा) - I का कार्यालय
OFFICE OF THE ACCOUNTANTGENERAL (AUDIT) – I
प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे मार्ग, मुंबई - ४०० ०२०
PRATISHTHA BHAVAN, 101, MAHARSHI KARVE Marg, MUMBAI - 400 020

**गोपनीय**

संख्या / No. : प्रमले/ले.प्र.स.IV/ एम.एफ.एस.सी.डी.सी.एल./ २०२१-२२/जा.क्र.२ दिनांक : १०.०४.२०२३

सेवा में,
प्रबंध निर्देशक,
महाराष्ट्र फिल्म स्टेज अँड कल्चरल डेव्लपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,
मुंबई

**विषय : ३१ मार्च २०२२ को समाप्त हुए वर्ष कंपनी महाराष्ट्र फिल्म, स्टेजअँड कल्चरल डव्लपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई के लेखों पर कंपनी अधिनियम, २०१३ की धारा १४३(६)(ब) के अंतर्गत भारत के नियंत्रक - महालेखापरिक्षक की टिप्पणियाँ ।**

महोदय,

३१ मार्च २०२२ को समाप्त हुए वर्ष के महाराष्ट्र फिल्म, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडल मर्यादित (MFSCDCL) मुंबई के लेखों पर कंपनी अधिनियम, २०१३ की धारा १४३(६)(ब) के अंतर्गतभारत के नियंत्रक एवं महालेखापरिक्षक की टिप्पणी (comments) संलग्न है ।

वार्षिक सर्वसाधारण सभा (A.G.M.) होने के पश्चात, वार्षिक रिपोर्ट की तीन मुद्रित प्रतियाँ कृपया इस कार्यालय को भेज दें, साथ ही उपरोक्त लेखों के वार्षिक प्रतिवेदन को विधानसभा में प्रस्तुत करने की तिथि को भी इस कार्यालय को सूचित करें ।

भवदीय,

(गुलजारी लाल)
प्रधान महालेखाकार (लेखापरिक्षा) - ।

संलग्न : यथोपरि

**कंपनी कायदा २०१३ मधील कलम १४३(६)(ब) नुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित दि.३१ मार्च २०२२ अखेर संपणाऱ्या वर्षाच्या लेख्यावरील भाष्य**

कंपनी कायदा २०१३ मध्ये निर्देशित केलेल्या चौकटीनुसार दि. ३१ मार्च २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाचेमहाराष्ट्र चित्रपट, रंगभूमीआणिसांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई ची वित्तीय पत्रके तयार करण्याची जबाबदारी कंपनी व्यवस्थापनाची आहे. कंपनी कायाद्यातील कलम १३९ (५) नुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी नियुक्त केलेल्या वैधानिक लेखा परिक्षक भारतीय सनदी लेखापालांच्या व्यावसायीक संस्थेने निर्देशीत केलेल्या लेखा परिक्षण प्रमाणकानुसार स्वतंत्र लेखापरिक्षाआधारे कायद्याचे कलम १४३ अंतर्गत कलम १४३ (१०) नुसार किंवा कायद्याप्रमाणे या वित्तीय पत्रकांवर त्यांचे मत देण्यास जबाबदार आहेत. हे त्यांच्या दि.१७ नोव्हेंबर, २०२२ च्या लेखापरिक्षण अहवालात दर्शविण्यात आले आहे.

मी, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्यावतीने असे भाष्य करतो की, कलम १४३(६)(अ) नुसार महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्या दि. ३१ मार्च २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या वित्तीय निष्कर्षावर पुरवणी लेखा परिक्षण केले आहे. हे पुरवणी लेखापरीक्षण वैधानिक लेखापरीक्षकांच्या कामकाजाच्या कागदपत्रांमध्ये प्रवेश न करता स्वतंत्रपणे केले गेले आहे आणि ते प्रामुख्याने वैधानिक लेखापरीक्षक आणि कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या चौकशी आणि काही लेखा नोंदीच्या निवडक तपासणीपुरते मर्यादित आहे. माझ्या पुरवणी लेखापरीक्षणाच्या आधारे, मी कायद्याच्या कलम १४३(६)(ब) अंतर्गत खालील महत्वाच्या बाबींवर प्रकाश टाकू इच्छितो, ज्या माझ्या लक्षात आल्या आहेत आणि ज्या माझ्या दृष्टीने आर्थिक अहवाल आणि संबंधित लेखापरीक्षण अहवाल चांगल्याप्रकारे समजून घेण्यासाठी आवश्यक आहेत.

**अ) फायदेशीरतेवर टिप्पणी**

**I. कार्यातून महसूल (टीप क्र.१९) - रु.६५.६२ कोटी**

१. उपरोक्तमध्ये रु.२.१९ कोटीचा समावेश नाही, कारण कोविड-१९ महामारीच्या आजारामुळे विविध निर्मिती संस्थांना दिलेली भरपाईची रक्कम, देय उत्पन्नाचा हिशेब ठेवण्याऐवजी आणि नंतर नफा व तोटा खात्यात वर्ग करुन नुकसान भरपाईची रक्कम खर्च करण्याऐवजी कंपनीने निव्वळ उत्पन्नाचा हिशेब केला. निव्वळ उत्पन्न दर्शविल्यामुळे महसूल खर्च रु.२.१९ कोटीने कमी दर्शविला गेला.

**ब) वित्तीय स्थितीवर टिप्पणी**

**II. मालमत्ता**

**१. चालू नसलेली मालमत्ता**

**अ) मालमत्ता, संयंत्र** आणि उपकरणे

**iii) चालू भांडवली कामे (टीप क्र.१०) - रु.९.६७ कोटी**

२. उपरोक्तमध्ये कंपनीच्या मास्टर प्लॅन प्रकल्पाशी संबंधित रु.६.०८ कोटीचा समावेश आहे जो जुलै, २०२१ मध्ये स्थगित करण्यात आला होता. प्रकल्पाच्या विकासासाठी मास्टर प्लॅन तयार करण्यासाठी आवश्यक सल्लामसलत आणि प्रशासकीय प्रक्रियात्मक कामांवर वरील खर्च करण्यात आला. चालू वर्षात कंपनीने प्रकल्प स्थगित केला असल्याने, त्यासाठी केलेला खर्च, खर्च केला गेला पाहिजे. तसे न केल्याने चालू भांडवली कामाचा अतिरेक झाला आहे आणि खर्च रु.६.०८ कोटीने कमी केला आहे.

**क) प्रकटीकरणावर टिप्पण्यां**

१. कंपनीने टीप ५१(ग) अंतर्गत खुलासा केला आहे की, कंपनीने कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या (CSR) न खर्च केलेल्या रकमेसाठी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या दि.२२.०१.२०२१ च्या अधिसूचनेनुसार तरतूद केली आहे. तथापि, लेखापरीक्षणात असे निरीक्षणास आले आहे की, हे चुकीचे आहे कारण कंपनी कायदा, २०१३ (अधिनियम) च्या कलम १३५(५) नुसार कंपनी कायदा, २०१३ च्या अनुसूची VII अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या निधीमध्ये खर्च न केलेली CSR रक्कम वित्तीय वर्षाच्या समाप्तीच्या सहा महिन्याच्या आत हस्तांतरीत करण्यास कंपनी जबाबदार होती. कंपनीने सीएसआरची रक्कम खर्च केली नाही किंवा सहा महिन्यात निधी हस्तांतरीत केला नाही. पुढे कायद्याचे कलम १३५(६) कलम १३५(५) चे पालन करण्यात चूक झाल्यास दंड आकारते. कंपनीने कायद्याचे कलम १३५(५) चे पालन न केल्याबद्दल आणि कायद्याचे कलम १३५(६) अंतर्गत नमूद केलेल्या दंडाबाबतच्या निर्णयाची स्थिती उघड करायला हवी होती. अशा प्रकारे प्रकटन या प्रमाणात कमी होते.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक
यांच्या वतीने

सही/-
(गुलजारी लाल)
प्रधान महालेखाकार (लेखापरिक्षा) - I

स्थळ : मुंबई
दिनांक : १०.०४.२०२३

# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
## दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५

### दि.३१ मार्च, २०२२ रोजीचे ताळेबंद पत्रक

(रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशिल | टिप क्र. | दि.३१ मार्च २०२२ रोजी | दि.३१ मार्च २०२१ रोजी |
|---|---|---|---|---|
| **अ.** | **समभाग आणि दायित्वे** | | | |
| १ | **भागधारकांचा निधी** | | | |
| | भाग भांडवल | २ | १,२२९.६४ | १,२२९.६४ |
| | राखीव व अतिरिक्त निधी | ३ | २४,४९०.२१ | २१,८६८.२४ |
| | | | **२५,७१९.८५** | **२३,०९७.८९** |
| २ | **स्थावर चालू दायित्वे** | | | |
| | अ. दिर्घ मुदत कर्जे | ४ | ५६.४७ | ५६.४७ |
| | ब. इतर दिर्घ मुदत दायित्वे | ५ | ६८१.२३ | ६९२.३२ |
| | क. दिर्घ मुदत तरतूदी | ६ | १६२.४६ | १६६.७१ |
| | ड. स्थगित कर मालमत्ता (निव्वळ) | | - | - |
| | | | **९००.१६** | **९१५.५०** |
| ३ | **चालू दायित्वे** | | | |
| | अ. व्यापारी देणी | ७ | | |
| | अ) सूक्ष्म व लघु उद्योजकांकडील एकूण देय थकबाकी | | - | - |
| | ब) सूक्ष्म व लघु उद्योजकांव्यतिरिक्त इतर | | ७४३.५१ | ३५५.५८ |
| | ब. इतर चालू दायित्वे | | २,६१४.५१ | २,२८४.१६ |
| | क. अल्प मुदत तरतूदी | ८ | ४८.१३ | ७०.६८ |
| | | ९ | **३,४०६.१५** | **२,७१०.४३** |
| | **एकूण** | | **३०,०२६.१६** | **२६,७२३.८१** |
| **ब.** | | | | |
| **१.** | **मालमत्ता** | | | |
| | **स्थावर चालू मालमत्ता** | | | |
| | **अ. मालमत्ता, संयंत्रे आणि यंत्रे** | | | |
| | **१. मालमत्ता, संयंत्रे आणि यंत्रे** | १० | २,०२२.२९ | २,२८३.३६ |
| | २. अमूर्त मालमत्ता | १० | ७४.७८ | ४८.०१ |
| | ३. चालू भांडवली कामे | १० | ९६७.०४ | ९६७.८१ |
| | ४. विकासांतर्गत अमूर्त मालमत्ता | १० | ७.७९ | ०.०० |
| | ब. स्थावर चालू गुंतवणूक | ११ | १२,९८०.०० | ३५०.०० |
| | क. दीर्घ मुदत कर्जे आणि अग्रिमे | १२ | १,९१६.८३ | १,७४८.०१ |
| | ड. स्थगित कर मालमत्ता (निव्वळ) | १३ | ३२०.९१ | ३२३.७६ |
| | | | **१८,२८९.६४** | **५,७२०.९५** |
| **२.** | **चालू मालमत्ता** | | | |
| | **अ.** वस्तूसूची | १४ | ४०.०७ | ४०.९७ |
| | ब. व्यापारी येणी | १५ | ३६५.३१ | ४५९.२७ |
| | क. रोख व रोख सदृश्य | १६ | १०,२३५.२३ | १८,८७०.९५ |
| | ड. अल्प मुदत कर्जे आणि अग्रिमे | १७ | ७६१.२० | ५९६.५८ |
| | इ. इतर चालू मालमत्ता | १८ | ३३४.७१ | १,०३५.०९ |
| | | | **११,७३६.५२** | **२१,००२.८६** |
| | **एकूण** | | **३०,०२६.१६** | **२६,७२३.८१** |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालाप्रमाणे
**मे. ए.पी. संझगिरी आणि कंपनी**
**सनदी लेखापाल**
फर्म रजि.क्र.११६२९३डब्ल्यू

**अंकुश गोयल**
भागीदार
सभासद क्र.१४६०१७

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७.११.२०२२

**संचालक मंडळाच्या वतीने**

**डॉ. अविनाश ढाकणे**
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएनः ०३०५८४२६

**बिभीषण चवरे**
संचालक
डीआयएनः ०८८८५९११

**आश्विनी कांबळे**
कंपनी सचिव
सभासद क्र.A३७८९१

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७.११.२०२२

## दि.३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा-तोटा पत्रक

(रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशिल | टिप क्र. | चालू वर्ष २०२१-२२ | मागील वर्ष २०२०-२१ |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यातून महसूल | १९ | ६,५६१.५२ | ५,५८४.१९ |
| २ | इतर उत्पन्न | २० | १,२०२.३५ | १,३५८.५६ |
| ३ | एकूण महसूल (१+२) | | ७,७६३.८७ | ६,९४२.७४ |
| ४ | **खर्च** | | | |
| | कर्मचाऱ्यांना सवलती खर्च | २१ | ८६३.९९ | ८९५.६३ |
| | घसारा आणि कर्ज माफी खर्च | १० | ४४६.९३ | ५००.३९ |
| | इतर खर्च | २२ | २,८१६.९५ | २,६०४.३६ |
| | **एकूण खर्च** | | ४,१२७.८७ | ४,०००.३८ |
| ५ | **अपवादात्मक वस्तू व करपर्व नफा (३-४)** | | ३,६३६.०० | २,९४२.३६ |
| ६ | **अपवादात्मक बाबी** | | ०.०० | ०.०० |
| ७ | **करपूर्व नफा (५-६)** | | ३,६३६.०० | २,९४२.३६ |
| ८ | **करखर्च** | | | |
| | चालू कर | | ९५०.०० | ८००.०० |
| | पूर्वीच्या वर्षाचे कर | | ०.०० | २४९.३२ |
| | स्थगित कर | | २.८५ | (८.३४) |
| | | | ९५२.८५ | १,०४०.९८ |
| ९ | **नियमित कार्यातून झालेला वर्षाचा नफा (७-८)** | | **२,६८३.१५** | **१,९०१.३८** |
| १० | अनियमित कार्याचा वर्षासाठी नफा | | ०.०० | ०.०० |
| ११ | अनियमित कार्यासाठीचा कर खर्च | | ०.०० | ०.०० |
| १२ | अनियमित कार्यातून नफा (करानंतर) | | ०.०० | ०.०० |
| १३ | **वर्षाकरिता (९+१२)** | | **२,६८३.१५** | **१,९०१.३८** |
| १४ | **मिळकत प्रति समभाग** | | | |
| | अ. मूळ | | २१८.२१ | १५४.६३ |
| | ब. विरलीकृत | २४ | २१८.२१ | १५४.६३ |
| | **समभागाचे नाममात्र मूल्य** | | १०० | १०० |
| | **महत्वाची लेखांकन धोरणे** | १ | | |
| | **वित्तीय विवरणांचा भाग असलेल्या टिप्पण्यां** | २ | | |

एकल वित्तीय विवरणाच्या अविभाज्य भाग असणाऱ्या टिप्पण्यां सोबत जोडल्या आहेत.
आमच्या सोबत जोडलेल्या अहवालाप्रमाणे

**मे. ए.पी. संझगिरी आणि कंपनी**
**सनदी लेखापाल**
फर्म रजि.क्र.११६२९३डब्ल्यू

**अंकुश गोयल**
भागीदार
सभासद क्र.१४६०१७

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७.११.२०२२

**संचालक मंडळाच्या वतीने**

**डॉ. अविनाश ढाकणे**
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ०३०५८४२६

**बिभीषण चवरे**
संचालक
डीआयएन: ०८८८५९११

**आश्विनी कांबळे**
कंपनी सचिव
सभासद क्र.A३७८९१

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७.११.२०२२

**दि.३१.०३.२०२२ रोजी संपलेल्या वर्षाकरिता रोखीचा ओघ (Cash Flow) दर्शविणारे पत्रक**

(रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशील | चालू वर्ष २०२१-२२ | मागील वर्ष २०२०-२१ |
|---|---|---|---|
| अ. | **चालू कार्यातील रोखीचा ओघ** | | |
| | **करपूर्व नफा** | ३,६३६.०० | २,९४२.३६ |
| | करिता जुळवणी : | | |
| | घसारा | ४४६.९३ | ५००.३९ |
| | व्याजावरील खर्च (निव्वळ) | ०.०० | ०.०० |
| | व्याजावरील उत्पन्न | (१,१७०.१२) | (१,१६७.४४) |
| | संशयास्पद कर्जाच्या परतफेडीकरिता केलेली तरतूद / (उलट) | ०.०० | ०.०० |
| | पूर्वकालीन कर | ०.०० | ०.०० |
| | **खेळत्या भांडवलाच्या बदलापूर्वीचा कार्यरत नफा** | **२,९१२.८१** | **२,२७५.३०** |
| | व्यापार व इतर येणीमधील घट / (वाढ) | (५४.८१) | (११३.१९) |
| | वस्तूसूचीमधील घट / (वाढ) | ०.९० | १०.१३ |
| | व्यापार व इतर देयतामधील घट / (वाढ) | ६८५.०६ | १८०.०६ |
| | **चालू उद्योगातून मिळालेली (वापरलेली) रोकड** | **३,५४३.९६** | **२,३५२.३०** |
| | प्रत्यक्ष अदा केलेले कर | (१,१००.७८) | (४९०.००) |
| | पूर्वकालीन कर | ०.०० | (२४९.३२) |
| | **चालू उद्योगातून मिळालेली (वापरलेली) निव्वळ रोकड (अ)** | **२,४४३.१७** | **१,६१२.९८** |
| ब. | **गुंतवणुकीतील रोखीचा ओघ** | | |
| | स्थिर मत्तेतील खरेदी आणि चालू भांडवली कामातील प्रगती | (२२४.३३) | (७७६.२८) |
| | बँकेतील मुदत ठेवी (निव्वळ) | (९१६.८९) | (१,३५१.३१) |
| | प्राप्त व्याज | १,८७०.५० | ७२३.७० |
| | **गुंतवणुकीतील निव्वळ (वापरलेली) रोकड (ब)** | **७२९.२८** | **(१,४०३.८९)** |
| क. | **वित्तीय कार्यातील रोखीचा ओघ** | | |
| | भाग भांडवल जारी करणे | | |
| | प्राप्त भाग हप्ता | | |
| | इतर पक्षांकडून घेतलेले कर्ज | | |
| | कर्जाची परतफेड | | |
| | अदा केलेले व्याज | ०.०० | ०.०० |
| | अदा केलेला लाभांश | (९५.०७) | (१४१.१२) |
| | अदा केलेला लाभांश कर | ०.०० | ०.०० |
| | **वित्तीय कार्यातील निव्वळ (वापरलेल्या) रोखीचा ओघ (क)** | **(९५.०७)** | **(१४१.१२)** |
| | **रोख व रोख सममूल्यातील निव्वळ वाढ / (घट) (अ+ब+क)** | **३,०७७.३९** | **६७.९७** |
| | **वर्षाच्या सुरुवातीला रोख आणि रोख सममूल्य** | १५३.८४ | ८५.८७ |
| | वर्ष अखेरीस रोख आणि रोख सममूल्य | ३,२३१.२३ | १५३.८४ |
| | रोख व रोख सममूल्य यांचा समावेश | | |
| | हातातील रोख | | |
| | हातातील धनादेश | | |
| | बँकेत चालू खात्यातील शिल्लक | | |
| | वर्षाच्या शेवटी हातातील आणि बँकेतील शिल्लक | | |
| | **उपरोक्त उघड केलेली निव्वळ वाढ / (घट)** | **३,०७७.३९** | **६७.९७** |

एकल वित्तीय विवरणाच्या अविभाज्य भाग असणाऱ्या टिप्पण्यां सोबत जोडल्या आहेत.
आमच्या सोबत जोडलेल्या अहवालाप्रमाणे

**मे. ए.पी. संझगिरी आणि कंपनी**
**सनदी लेखापाल**
फर्म रजि.क्र.११६२९३डब्ल्यू

**अंकुश गोयल**
भागीदार
सभासद क्र.१४६०१७

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७.११.२०२२

**संचालक मंडळाच्या वतीने**

**डॉ. अविनाश ढाकणे**
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएनः ०३०५८४२६

**बिभीषण चवरे**
संचालक
डीआयएनः ०८८८५९११

**आश्विनी कांबळे**
कंपनी सचिव
सभासद क्र.A३७८९१

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७.११.२०२२

**दि. ३१.०३.२०२२ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता**
**वित्तीय निष्कर्षावर असणाऱ्या टिप्पण्या**

**१. महत्वाची लेखांकन धोरणे :**

**अ) आर्थिक आकडेवारीचे प्रपत्र तयार करण्याचा आधारः**

वित्तीय प्रपत्रे ऐतिहासिक परिव्यय आधारे आणि वाढी आधारे कंपनी कायदा २०१३ (द ॲक्ट) च्या कलम १३३ मध्ये निर्देशित केल्यानुसार लागू असलेल्या लेखे प्रमाणकाशी सर्व बाबतीत सुसंगत अशी तयार करण्यात आली आहेत.

वित्तीय विवरणपत्रे ऐतिहासिक खर्च अधिवेशनाच्या आधारे तयार केली जातात आणि लेखाधोरणे सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेखातत्वानुसार सुसंगत व अनुरुप आहेत.

महामंडळाचे उत्पन्न आणि खर्च वाणिज्यिक पद्धतीनुसार जमा झालेल्या वाढीनुसार लेखांकनाच्या स्थितीनुसार दर्शविण्यात येते.

**ब) अंदाजपत्रकाचा वापर :**

सर्वसाधारणपणे स्विकारलेल्या लेखातत्वानुसार वित्तीयपत्रके तयार करताना अंदाज आणि समजूती गृहित धरताना त्याचा वित्तीय पत्रकाच्या तारखेस सादर केलेल्या मत्ता व दायित्वाच्या रकमा आणि अहवाल कालावधीत सादर केलेल्या महसूल आणि खर्चाच्या रकमांवर परिणाम करणार नाही. प्रत्यक्ष परिणाम व अंदाजित परिणाम यांच्यातील फरक ज्यावेळी परिणामांची पूर्तता होईल त्याचवेळी निदर्शनास येईल.अंदाजे आणि मूलभूत धारणा चालू असलेल्या आधारावर पुनरावलोकन केले जातात.लेखाच्या अंदाजानुसार केलेली कोणतीही पुनरावृत्ती वर्तमान आणि भविष्यकाळात संभाव्यपणे ओळखली जाऊ शकते.

**क) महसूल ओळखः**

**अ)** कंपनीने ज्याठिकाणी रोखीआधारे नोंद घेतली आहे अशा खालील बाबी वगळता उपार्जित पद्धतीने लेखांकन केले आहे.

१. विमा दावा जर असेल तर

२. विवादित कर्जे आणि अग्रिमांवरील व्याज उत्पन्न

**ब)** भाडे उत्पन्न हे संस्थेबरोबर ठरविलेल्या अटीनुसार व वाढीआधारे गृहीत धरले जाते.

**क)** महसूल हा ठरविलेल्या उद्दिष्टांनुसार ज्यावेळी निश्चितता आहे त्यानुसार गृहीत धरला जातो.

**ड) मालमत्ता, यंत्र उपकरणे:**

**अ)** मालमत्ता, यंत्र आणि उपकरणे या पूर्ण किंमतीने संचित घसारा वजा करुन दर्शविल्या आहेत. मूल्य हे खरेदी किमती इतके व त्या मत्तेला योग्य वापरासाठी कामाच्या स्थितीत आणण्यासाठी केलेला खर्च धरून आहे.

**ब)** चालू असलेल्या बांधकामाबाबत ज्या वर्षात काम सुरु केले आहे हे गृहित न धरता स्थापत्यकारांनी देयक प्रमाणित केलेल्या वर्षात ते ओळखले जाते.

**क)** सर्व स्थिर मत्तेवर कंपनी कायदा २०१३ मधील टिप II मध्ये निर्देशित केलेल्या दरानुसार उतरत्या मुल्यांकना आधारे घसाऱ्याची तरतूद करण्यात आली आहे.

**ड)** भांडवली म्हणून दर्शविलेल्या साफ्टवेअर खर्च आणि वेबसाईटसारख्या इतर अमूर्त मालमत्तांचा खर्च ५ वर्षाच्या कालावधीत परिशोधित केल्या जातात.

**इ)** आर्थिक वर्ष २०१९-२० पासून मूर्त मालमत्तेसाठी भंगार मूल्य मूळ किंमतीच्या ५% म्हणून घेतले जाते आणि त्यावर अशा मालमत्तेच्या आयुष्याची समाप्ती, भंगार मूल्य म्हणून ५% ठेवले जाते. परंतु जर WDV येथे धोरण स्वीकारण्याच्या वेळी (म्हणजे आर्थिक वर्ष २०१९-२० च्या सुरुवातीला) मूळच्या अशा ५% पेक्षा कमी किंमत आहे अशा मालमत्ता WDV वर नेल्या जातात.

**इ) वस्तूसूची :**

फर्निचर व फिक्चर्स, इलेक्ट्रीकल हार्डवेअर मटरिअल्स, स्टुडीओ बल्बस इत्यादीसारख्या बाबी मूल्याने मूल्यांकित करण्यात आल्या आहेत.

**फ) सेवानिवृत्तीचे फायदे**

**अ)** भविष्य निर्वाह निधी व इतर निधीची वर्गणी वाढीआधारे लेखांकित करण्यात आली असून अहवाल वर्षात नफा तोटा पत्रकात आकारण्यात आली आहे.

**ब)** महामंडळाने जीवन विमा महामंडळाच्या सहाय्याने उपदान विश्वस्त निधीची स्थापना केली असून प्रत्येक वर्षी विमा हप्त्याची रक्कम जीवन विमा महामंडळाला भरणा करण्यात येते.

**क)** सानुग्रह अनुदान व रजा रोखीकरणाचे दायित्व वाढीआधारे तरतूद करण्यात आली आहे.

**ग) गुंतवणूक :**

ताबा घेतलेल्या तारखेपासून ज्या गुंतवणूका १ वर्षापेक्षा ताब्यात आहेत त्या कायम घट होणारे मूल्यांकरिता केलेली तरतूद कमी करुन परिव्ययाने दीर्घ मुदत गुंतवणूक म्हणून वर्गीकरण केल्या आहेत. दीर्घ मुदती व्यतिरिक्तच्या गुंतवणूका परिव्ययाने किंवा योग्य बाजारी मूल्य यापैकी जी कमी असेल त्या मूल्याने चालू गुंतवणूका म्हणून मूल्यांकित केल्या आहेत.

**ह) शासकीय अनुदान :**

शासकीय अनुदान / सहभाग ज्यावेळी योग्य त्या कारणासाठी जे प्राप्त केले जाते त्यावेळी ते गृहीत धरले जाते. महसूली अनुदानाची ओळख वित्तीय पत्रकात उत्पन्न किंवा संबंधित खर्चातून कपात म्हणून दर्शविले जाते. भांडवली अनुदान/सहभाग जेव्हा ते योग्य त्या स्थिरमत्तेशी संबंधित असतील तेव्हा ते योग्य त्या स्थिर मत्तेत जमा दर्शविले जातात.

**आय) उत्पन्नावरील कराचे लेखांकन :**

**अ) चालू कर :**

भारतीय आयकर कायदा १९६१ मधील तरतूदीनुसार प्रत्यक्ष कर दायित्व आधारे आणि कर भत्ते आणि सवलती गहित धरल्यानंतर चालू आयकरासाठी तरतूदी केली जाते.

**ब) प्रलंबित कर :**

प्रलंबित करमत्ता आणि दायित्वे ही आयकरासाठी घेतलेला नफा व वित्तीय पत्रकाप्रमाणे नफा यांच्यातील वेळोवेळी होणारी प्रकरणे व फरक लक्षात घेऊन दर्शविला जातो. प्रलंबित करमत्ता व दायित्वे ही कर दर व कर कायद्यातील ताळेबंदाच्या तारखेपर्यंत झालेले बदल लक्षात घेऊन मापली जातात. प्रलंबित कर मत्ता फक्त भविष्यात प्राप्त होणाऱ्या मत्तेची योग्य निश्चितता लक्षात घेऊन ओळखली जाते. करमत्ता प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेस पुनश्चः विचारात घेतल्या आहेत.

**ज) तरतूदी आणि आकस्मिक दायित्व :**

भूतकाळातील एखाद्या घटनेचा परिणाम म्हणून वर्तमानात बंधन असताना कंपनी एक तरतूद करते कदाचित संसाधनांचा बहिर्वाह आवश्यक आहे आणि त्या रकमेचा विश्वासार्ह अंदाज लावला जाऊ शकतो. बंधन संभाव्य दायित्व असेल तेव्हा आकस्मिक दायित्वासाठी प्रकटीकरण केले जाते किंवा सध्याचे दायित्व ज्यासाठी संसाधनांचा बहिर्वाह आवश्यक आहे, परंतु कदाचित नसेल. जेथे आवश्यक आहे तेथे संभाव्य दायित्व किंवा सध्याचे दायित्व ज्याच्या संदर्भात संसाधनांच्या बाहेर जाण्याची शक्यता असेल अशी दूरस्थ कोणतीही तरतूद किंवा प्रकटीकरण केले जात नाही. आकस्मिक दायित्वे टीपाद्वारे प्रकट केली आहेत.

**के) स्थिरमत्तेतील झीज :**

कंपनी ताळेबंद तारखेला मालमत्तेच्या झीजेचे कोणतेही संकेत आहेत की नाही याचे मूल्यांकन करते. असे कोणतेही संकेत अस्तित्वात असल्यास व्यवस्थापन मालमत्तेच्या वसूल करण्यायोग्य रकमेचा अंदाज लावते. मालमत्तेची अशी वसूल करण्यायोग्य रक्कम तिच्या वहन रकमेपेक्षा कमी असल्यास वहन रक्कम त्या वसूल करण्यायोग्य रकमेपर्यंत कमी केली जाते. नफा तोटा विवरणपत्रात कपात हानी मानली जाते आणि ओळखली जाते. जर ताळेबंद तारखेला असा संकेत असेल तर पूर्वीचे मूल्यांकन केलेली झीजेचे नुकसान आता अस्तित्वात नाही, वसूल करण्यायोग्य रकमेचे पुनर्मूल्यांकन केले जाते आणि कमाल घसारा अभिलेखांतर्गत परिव्ययाच्या अधिन असलेल्या पुनर्प्राप्तीयोग्य रकमेवर मालमत्ता परावर्तीत होते.

**ल) प्रतिभाग उत्पन्न :**

मूलभूत प्रतिभाग उत्पन्न (इपीएस) हे न्याय हक्क समभाग धारकांशी संबंध लावण्याजोग्या त्या कालावधीतील उठून दिसणाऱ्या वजनदार न्याय हक्क समभागाच्या सरासरी संख्येने निव्वळ नफा किंवा तोट्यास भागून काढली आहे. सौम्य प्रतिभाग उत्पन्न काढण्याच्या हेतुने, न्यायहक्क समभागधारकांशी संबंध लावण्याजोग्या त्या वर्षात झालेल्या नफा किंवा तोटा आणि उठून दिसणाऱ्या वजनदान न्यायहक्क समभागांच्या त्या वर्षातील सरासरी संख्या यांची सौम्यतेची शक्यता दर्शविणाऱ्या न्यायहक्क समभागांच्या परिणामांकरिता जुळवणी केली गेली आहे.

**दि.३१.०३.२०२२ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता**
**वित्तीय निष्कर्षावर असणाऱ्या टीपा**

**२) भागभांडवल**

(रुपये लाखात)

| तपशिल | दि.३१.०३.२०२२ रोजी | दि.३१.०३.२०२१ रोजी |
|---|---|---|
| | भाग संख्या | रक्कम रुपयात |
| **अ. अधिकृत** | | |
| १५,००,००० (१५,००,०००) प्रत्येकी रु.१००/- चे समभाग | १,५००.०० | १,५००.०० |
| **क. जारी केलेले, अभिदत्त व भरणा केलेले** | | |
| १२,२९,६४१ (१२,२९,६४१) भरणा केलेले प्रत्येकी रु.१००/- चे समभाग | १,२२९.६४ | १,२२९.६४ |
| **एकूण** | **१,२२९.६४** | **१,२२९.६४** |

अ. चालू वित्तीय वर्षात आणि यापूर्वीच्या वर्षात अभिदत्त व भरणा केलेल्या भागभांडवलात कोणताही बदल नाही.

ब. **समभागाशी संलग्न अटी व अधिकार :**

कंपनीकडे फक्त एकाच वर्गाचे प्रत्येकी रु.१००/- या समान किंमतीचे समभाग आहेत. प्रत्येक समभागधारकास प्रति समभाग एक मत देण्याचा अधिकार दिला आहे. संचालक मंडळाने प्रस्तावित केलेला लाभांश आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेत भागधारकांच्या मान्यतेच्या अधीन आहे. जर कंपनीचे दिवाळे वाजले तर समभागधारकास कंपनीची मालमत्ता प्राप्त करण्याचा अधिकार असेल. हे वाटप समभागधारकाकडे असलेल्या समभागांच्या संख्येशी प्रमाणित असेल.
चालू वर्षादरम्यान महामंडळाने प्रस्तावित केलेला लाभांश रु.१३४.१६ लाख (मागील वर्षी रु.९५.०७ लाख) म्हणजेच प्रति समभाग रु.१०.९१०३ (मागील वर्षी रु.७.७३१५)

**क. महामंडळातील जे भागधारक ५% पेक्षा जास्त समभाग धारण करतात त्याभागधारकांचा सविस्तर तपशील :**

| भागधारकाचे नाव | दि.३१.०३.२०२२ रोजी | | दि.३१.०३.२०२१ रोजी | |
|---|---|---|---|---|
| | भाग संख्या | धारण केलेली टक्केवारी | भाग संख्या | धारण केलेली टक्केवारी |
